follow us : /rajdandlive

मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड

www.rajdand.com

। पश्चिम महाराष्ट्र ।

२५ वर्षे विश्वासार्हतेची



पुणे-नाशिक महामार्गावरील रोहकल फाट्यावर वाहतुकीचा बोजवारा

वृत्त पान ३ वर...

RNI Regd. No. 72105/99 ✲ वर्ष २५ ✲ अंक २२८ ✲ सातारा ✲ शुक्रवार, दि. २६ एप्रिल २०२४ ✲ पाने ६ (सुप्रभात) ✲ किंमत ५/– रूपये

# ‘मोदी गॅरंटी’चा चेक कधीच वटत नाही! – शरद पवार

- विखे कुटुंबातील नंतरच्या पिढ्यांनी काय दिवे लावले?
- शरद पवार यांची विखे पिता पुत्रावर घणाघाती टीका
- नीलेश लंके यांच्या प्रचारार्थ राहुरी येथे सभा

**पारनेर/वार्ताहार**

**स्व.धनंजय गाडगीळ, विठ्ठलराव विखे यांनी आशिया खंडातील पाहिला सहकारी साखर कारखाना उभा केला.त्यानंतर विखे यांच्या नंतरच्या पिढ्यांनी काय दिवे लावले असा सवाल करतानाच,त्यांच्या डोक्यात सत्तेची हवा गेली असून आपले अपयश झाकण्यासाठी ते आता टीका टिपन्नी करीत असल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) अध्यक्ष शरद पवारांनी केला.**



महाविकास आघाडीचे उमेदवार नीलेश लंके यांच्या प्रचारार्थ राहुरी येथे आयोजित करण्यात आलेल्या सभेत शरद पवार बोलत होते. यावेळी माजी खासदार प्रसाद तनपुरे, माजी मंत्री प्राजक्त तनपुरे, आमदार लहू कानडे, मा. आ. दादा कळमकर, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख प्रा. शशिकांत गाडे, 'आप'चे जिल्हाध्यक्ष राजू आघाव, रावसाहेब म्हस्के, संदीप वर्पे, योगिता राजळे, अरूण कडू, किरण कडू, अरूण तनपुरे, सचिन म्हसे, अमृत धुमाळ, राजूभाऊ शेटे, धनराज गाडे, बाळासाहेब आढाव, प्रकाश देठे, सुरेश वाबळे, मच्छिंद्र सोनवणे, संपत म्हस्के यांच्यासह मोठा जनसमुदाय यावेळी उपस्थित होता.

पवार म्हणाले की,दुष्काळी जिल्हा म्हणून नगरची ओळख होती.त्या काळात जिरायत भागाच्या जमीनी बागायती करण्यासाठी निळवंडे प्रकल्प उभा करण्याचा निर्णय झाला. मात्र त्यावेळी,आज जे लोकसभा निवडणुकीच्या रिंगणातील विरोधी उमेदवार आहेत त्यांच्या वाडवडीलांनी निळवंडेला विरोध केला.आता ते पुन्हा लोकसभेमध्ये जाऊ पाहत आहेत.त्यांना रोखण्याचे काम करावेच लागेल असे पवार म्हणाले.

खा.विखे यांना टोला लगावताना पवार म्हणाले की,कोणी इंग्रजी बोलतो म्हणून शहाणा झाला असे होत नाही. तुमचे इंग्रजी बोलणे तुम्हाला लखलाभ. नीलेश लंके यांच्यासारखा फाटका माणूस,फाटक्या माणसाच्या हिताची जपवणूक करणारा असल्याने लंके यांना (पान ५ वर)

### त्यांच्या ‘गॅरंटीचा चेक’ वटत नाही !

**या निवडणूकीत मोदी गॅरंटीचा गवगवा केला जातोय. ही टीकाऊ गॅरंटी नाही. त्यांच्या गॅरंटीचा चेक वटत नाही. मोदी यांनी सत्तेचा गैरवापर केला. ईडी, सीबीआयच्या माध्यमातून खोट्या केसेस केल्या. त्यांच्या विचाराविरोधात वागले तर इडी, सीबीआयचा वापर करून त्रास देण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचे पवार म्हणाले.**

### विविध घटकांच्या प्रश्नांसाठी ‘नीलेश लंके’ उत्तर

**आमचा उमेदवार दिसायला फाटका आहे. दहा बाय दहाच्या खोलीत राहणारा हा माणूस. कांदा, कापूस, सोयाबिन आदी शेतकरी वर्गाशी निगडीत प्रश्न, स्पर्धा परिक्षा देणारे विद्यार्थी, वंचितांचे प्रश्न मांडण्यासाठी नीलेश लंके हेच एकमेव उत्तर असल्याचे पवार म्हणाले.**





# मोहोळ यांच्या विजयाची औपचारिकता बाकी

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विश्वास; प्रचंड गर्दीत मोहोळ यांचा अर्ज दाखल

**राजदंड न्यूज नेटवर्क**

**पुणे :** 'मुरलीधर मोहोळ यांना निवडून आणण्यासाठी पुणेकरांमध्येच प्रचंड उत्साह आहे. पुणेकरांनीच ठरवले असल्यामुळे मोहोळ यांच्या विजयाची फक्त औपचारिकता बाकी आहे. त्यावर फक्त शिक्कामोर्तब व्हायचं आहे,' असे सांगून 'संपूर्ण महाराष्ट्रात भारतीय जनता पक्षाला मागच्या वेळेपेक्षा अधिक जागा मिळतील,' असा विश्वास राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी व्यक्त केला.

भारतीय जनता पक्षासह घटक पक्षांच्या महायुतीचे उमेदवार मुरलीधर मोहोळ यांनी गुरुवारी सकाळी पुणे लोकसभा मतदारसंघातून आपला उमेदवारी अर्ज भरला. याप्रसंगी फडणवीस बोलत होते.

'पुण्यात लोकांचे भाजप आणि महायुतीवर प्रेम आहे. महापौर म्हणून खूप चांगले काम केलेला उमेदवार आम्ही दिला आहे आणि जनता आमच्या पाठीशी आहे. दिवंगत गिरीशभाऊ बापट यांनी पुण्यात कार्यकर्त्यांचा अतिशय चांगला वारसा आम्हाला दिला आहे. त्यामुळे इथे मुरलीधर मोहोळ निवडून येतील याबद्दल आमच्या मनात शंका नाही,' असेही ते म्हणाले.

'जे ५४२ जागांमध्ये फक्त १० जागा उभ्या करतात, त्यांच्या जाहीरनाम्याला काय अर्थ आहे,' अशा शब्दांत त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार यांच्या जाहीरनाम्यावरही टीका केली.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री रामदास आठवले, राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, उद्योग मंत्री उदय सामंत, विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, खासदार डॉ. मेधा कुलकर्णी, आमदार माधुरी मिसाळ, भीमराव तापकीर, सुनील कांबळे, सिद्धार्थ शिरोळे, (पान ५ वर)

> **“ पुणेकरांनीच ठरवले असल्याने पुण्यात मोहोळ यांचा विजय सहज होईल. त्यांनी पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या अनेक योजना पुण्यात राबवल्या आहेत. भविष्यातही त्यांची दूरदृष्टी पुणेकरांना एक चांगला खासदार निवडल्याची अनुभूती देईल, अशी खात्री वाटते.**
>
> **– देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री**

> **“ पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली आणि माननीय देवेंद्रजी यांच्या प्रेरणेने आज उमेदवारी अर्ज भरला. पुणेकरांची सेवा आजवर करत आलो आहेच. आता थोड्या व्यापक स्वरुपात ही सेवा करण्याची संधी पुणेकर देतील हा विश्वास आजची अलोट गर्दी पाहून निर्माण झाला आहे. त्यामुळे मी पुणेकरांचा उमेदवार आहे, पुणेकरच मला निवडून देतील.**
>
> **– मुरलीधर मोहोळ**

## थोडक्यात

### शाहूनगर येथे घरफोडी

**सातारा :** शाहूनगर, सातारा येथे अज्ञात चोरट्यांनी घरफोडी करुन दागिन्यांची चोरी केली. चोरट्यांनी घरातून सोन्याचे वेढणे, रोख २७०० रुपये असा एकूण ३२७०० रुपये किंमतीचा मुद्देमाल चोरुन नेला. ही घटना दि. १९ ते २२ एप्रिल या कालावधीत घडली आहे.

याप्रकरणी सचिन शिवाजीराव आटकेकर (वय ४३, रा.शाहूनगर, सातारा) यांनी शहर पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे.

### विवाहितेच्या छळ प्रकरणी पतीवर गुन्हा

**सातारा :** विवाहितेला वेळोवेळी मानसिक त्रास देवून आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी पती विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सुहास महादेव निंबाळकर (रा.कोडोली, सातारा) याच्याविरुध्द शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

सुहास व आकांक्षा यांचा ३ वर्षापूर्वी विवाह झाला आहे. मात्र विवाहानंतर पती वारंवार त्रास देवून माहेरहून पैसे आणण्यासाठी मारहाण करत होता. यावरुन आकांक्षाची आई सुरेखा नंदकुमार साळवे (रा. कोडोली) यांनी पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे.

### नोकरी लावतो सांगून पाच लाखांची फसवणूक

**सातारा :** लिपीक पदाची पर्मनंट नोकरी लावतो, असे सांगून ऑनलाईन व रोख अशी एकूण ५ लाख ७३ हजार रुपये घेवून फसवणूक केल्याप्रकरणी अज्ञातावर सातारा शहर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल झाली आहे.

याप्रकरणी शैलेंद्र राजेंद्र नायकवडी (वय ३३, रा. सदरबझार) यांनी तक्रार दिली आहे. ही घटना दि. २९ सप्टेबर २०२३ ते २० मार्च २०२४ या कालावधीत वेळोवेळी घडली आहे. ऑनलाईन २ लाख ४७ हजार रुपये व ३ लाख २६ हजार रुपये रोख दिले असल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

# ‘प्रतापगड’ गिळंकृत करण्याचे षड्यंत्र हाणून पाडले

## खा. उदयनराजेंचा घणाघात; महायुतीच्या पाठीशी राहण्याचे आवाहन

**राजदंड / पाचगणी**

माझ्या विरोधात लोकसभा निवडणुकीसाठी उभे असलेल्या उमेदवाराने सत्तेवर असताना प्रतापगड साखर कारखाना गिळंकृत करण्याचे षडयंत्र रचले होते. मी योग्य वेळी ते हाणून पाडले, म्हणून हा कारखाना शेतकऱ्यांच्या मालकीचा राहिला आहे, असा घणाघात महायुतीचे लोकसभा उमेदवार खासदार उदयनराजे भोसले यांनी केला.



सातारा लोकसभा निवडणूकीच्या अनुषंगाने आज मेढा, मानकुमरे पॉईंट ता.जावली येथे महायुतीच्या कार्यकर्त्यांचा भव्य मेळावा मोठ्या उत्साहात पार पडला.

या मेळाव्यात उदयनराजे बोलत होते. जावळी तालुक्यातील सातारा विकास आघाडी, नगर विकास आघाडी, भारतीय जनता पक्षाचे सर्व आजी, माजी जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, पार्लमेंटरी बोर्ड सदस्य तसेच इतर समितीवर असलेले अशासकीय सदस्य व महायुती मधील सर्व घटक पक्षांचे प्रमुख पदाधिकारी या मेळाव्यास उपस्थित होते. (पान ५ वर)

# वाई अर्बन बँकेवरील कर्जवाटपाबाबतचे निर्बंध रिझर्व्ह बँकेकडून शिथील

**राजदंड / वाई**

दि वाई अर्बन को ऑप बँक लि वाई बँकेच्या जून २०२३ मध्ये नवीन संचालक मंडळाची बिनविरोध निवड होऊन श्री. अनिल देव यांचे अध्यक्षतेखाली उपाध्यक्ष डॉ. श्री.शेखर कांबळे, वरिष्ठ संचालक श्री. विवेक पटवर्धन व इतर सर्व संचालक यांनी अडचणीच्या काळात बँकेची धुरा समर्थपणे घेतली. बँकेची कर्ज वसुली चांगली होऊन एनपीए कमी करण्याचे एकमेव ध्येय डोळ्यासमोर ठेऊन संचालक मंडळाने वसुलीकरता




आवश्यक ठिकाणी कटू निर्णय घेऊन वसुली प्रक्रिया सर्व अधिकाऱ्यांच्या व कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने प्रभावीपणे राबवली. बँकेचे संचालक मंडळ व कर्मचारी वर्गाने रिझर्व्ह बँकेला NPA कमी करून दाखविल्याने सदरचे निर्बंध रिझर्व्ह बँकेने शिथिल केले आहेत. बँक आता रु. २५ लाखांपर्यंतची तारणी कर्जे सक्षम खातेदारांना देऊ शकते त्यामुळे बँकेचे (पान ५ वर)

# जावलीत रिपाइं आठवले गटाकडून भाजपाला सोडचिट्ठी



**मेढा :** राज्यात व देशात रिपाईची युती भाजपा बरोबर असताना सातारा जिल्ह्यातील कुठल्याही स्थानिक स्वराज्य संस्था, पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगरपालिका इत्यादी निवडणुकीत रिपाईला काही ठिकाणी राखीव जागा असताना सुद्धा एकही जागा देत नाहीत. साधे विचारातही घेतले जात नाही. नुकत्याच झालेल्या जिल्हा नियोजन समितीच्या निवडीत महायुतीत नवीन आलेल्या घटकपक्षाला जागा दिल्या परंतु रिपाईचे जिल्हा अध्यक्ष अशोकराव बापू गायकवाड यांना जाणीवपूर्वक डावलण्यात आले. तालुक्यातील कुठल्याही शासकीय कमिटीवर रिपाईच्या पदाधिकार्यांना घेतले जात नाही.

मागील लोकसभेच्या निवडणुकीत संपूर्ण देशातून फक्त साताराची जागा रिपाईला दिली. असतानाही (पान ५ वर)

# ‘महाबळेश्वर अर्बन बँके’वर अजितदादा गटाचे वर्चस्व

- आ. मकरंद पाटील यांचे कट्टर समर्थक सुतार व बावळेकर यांची अध्यक्ष व उपाध्यक्षपदी वर्णी

**महाबळेश्वर :** दि महाबळेश्वर अर्बन बँकेच्या अध्यक्षपदी संचालक समीर सुतार यांची तर उपाध्यक्षपदी युवा संचालक शरद बावळेकर यांची बिनविरोध निवड करण्यात आली निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून सहाय्यक निबंधक अनुराधा पंडितराव यांनी काम पाहिले .बँकेच्या सभागृहात सुतार व बावळेकर यांच्या समर्थकांनी गर्दी केली होती. मिठाई वाटून व फटाक्यां ची आतशबाजी करून कार्यकर्त्यांनी आनंद व्यक्त केला.

मागील महिन्यात अर्बन बँकेच्या संचालक मंडळ निवडीसाठी सर्वत्रिक निवडणूक घेण्यात आली. बँकेचे अध्यक्ष व उपाध्यक्ष निवडीसाठी नवनिर्वाचित १३ संचालकांची बँकेच्या सभागृहात सर्वसाधरण सभा आयोजित करण्यात आली होती. दरम्यान निवडून आलेल्या नव्या आणि जुन्या संचालकांमध्ये पदाधिकारी निवडीवरून दोन गट पडल्याचे वृत्त प्रसिद्ध झाले होते या वृत्तामुळे सभासदामध्ये चुकीचा संदेश पोहचण्याचा धोका



असल्याचे काही संचालकांच्या लक्षात आले त्यांनी या वृत्ताची दखल घेऊन सर्व संचालकांनी एकत्र बसून पदाधिकारी बिनविरोध निवडण्याचा निर्णय घेतला. संचालकांच्या बैठकीत झालेल्या निर्णया प्रमाणे आजच्या सभेत अध्यक्ष पदासाठी समीर सुतार व उपाध्यक्ष पदासाठी शरद बावळेकर यांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले. प्रत्येक पदासाठी एक एक उमेदवारी अर्ज दाखल झाल्याने निवडणूक निर्णय अधिकारी अनुराधा पंडितराव यांनी बँकेच्या अध्यक्षपदी संचालक समीर सुतार यांची तर उपाध्यक्षपदी शरद बावळेकर यांची बिनविरोध निवड झाल्याचे घोषित केले. सुतार व बावळेकर यांच्या नावाची अधिकृत घोषणा झाल्यावर सभागृहात उपस्थित असलेल्या संचालकांनी जोरदार टाळ्यांच्या गजरात घोषणेचे स्वागत केले.

निवड जाहीर करून सहय्यक निबंधक अनुराधा पंडितराव व इतर अधिकारी यांनी अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचे स्वागत केले. यावेळी बँकेचे मावळते अध्यक्ष दत्ताजी वाडकर. माजी अध्यक्ष राजेश कुंभारदरे, (पान ५ वर)

# ‘कट-कारस्थानांचा डीएनए’ हा भाजपचा, काँग्रेसचा नव्हे!

## वारसा हक्क संपत्तीकर लावण्याचे मनसुबे २०१९ साली भाजपचेच : गोपाळ तिवारी

**राजदंड न्यूज नेटवर्क**

**पुणे :** इंडीयन ओव्हरसीजचे (विदेशी) काँग्रेसचे अध्यक्ष सॅम पित्रोदा यांनी शिकागो येथील एका कार्यक्रमात, अमेरीकेतील वारसाहक्क संपत्ती बाबत काय कायदा आहे (?) याची माहीती दिली. ते अमेरीकेचे नागरीक असून त्याचा अर्थोअर्थी भारताशी काहीही संबंध नाही. अमेरीकेत एखादी श्रीमंत व्यक्ती मृत पावल्यास त्याची सु ५५ % संपत्ती 'वारसा कराच्या' रुपाने सरकार जमा होते व ती सरकारच्या कोषागारातुन समाज कल्याणाकरीता खर्च होते, एवढेच सॅम पित्रोडा म्हणाले होते. यावर काँग्रेस नेते जयराम रमेश यांनी सॅम पित्रोडा यांचे वक्तव्याशी काँग्रेसचा कोणताही संबंध नसल्याचे देखील सांगितले आहे. तरी देखील 'भाजपचे नेते ते प्रवक्ते' नेतृत्वाकडून आलेला खोटारडेपणाचा प्रपोगंडा करण्याचा



वारसाहक्क निभावत, अमेरीकन वास्तव्य असलेल्या पित्रोदांच्या विधानाचा कपोलकल्पित आधार घेत व अकलेचे तारे तोडत काँग्रेस भारतात वारसा हक्क संपत्ती कर लाऊन देशातील नागरीकांची संपत्ती लुटण्याचे कट कारस्थान रचत असल्याचा(?) बालीश व हास्यास्पद आरोप करत असल्याचे प्रतिपादन काँग्रेस राज्य प्रवक्ते गोपाळ तिवारी यांनी केले.

ते पुढे म्हणाले की, मुळात भाजप नेते व प्रवक्त्यांनी किमान हे लक्षांत ठेवावयास हवे होते की, मुळात काँग्रेसचा न्याय पत्र जाहीरनामा हा सत्ताधारी पक्षाच्याही अगोदर जाहीर झाला आहे..! त्यामध्ये वारसाहक्क संपत्ती कराचा कुठेही ऊल्लेख नाही..किमान आरोप करण्यापुर्वी हे तरी तपासले पाहीजे होते..!

तसेच जर 'वारसा हक्क संपत्तीकराच्या' रुपाने देशातील नागरीकांची संपत्ती लुटण्याचे कट - कारस्थान जर कोणी केले असेल, तर दस्तूरखुद्द मोदी - शहांच्या विकसीत भाजपने २०१९ मध्ये तत्कालीन अर्थमंत्री जयवंत सिन्हा यांनी वारसाहक्क संपत्तीकर भारतात लागु करण्याचे विधान केले होते.. किमान हे तरी भाजपच्या भाषणजीवी नेतृत्वाने लक्षात घ्यायला हवे होते..! त्यामुळेच 'कट कारस्था करण्याचा डीएनए हा भाजपचाच' असल्याचे ध्यानात येईल अशी पुस्ती ही काँग्रेस राज्य प्रवक्ते गोपाळ तिवारी यांनी जोडली.

# पाण्यासाठी खंडाळ्यात धरणे आंदोलन

**खंडाळा :** जिल्हाधिकाऱ्यांनी तोंडी आश्वासन देऊनही धोम-बलकवडी धरणातील पाणी खंडाळा तालुक्यासाठी अद्यापपर्यंत सोडण्यात न आल्याने संतप्त झालेले नागरिक व शेतकऱ्यांद्वारे खंडाळा तहसील कार्यालयाबाहेर धरणे आंदोलनाला सुरुवात करण्यात आली.

याबाबत अधिक माहिती अशी की, गेल्या आठवड्यात तालुक्यातील नागरिकांद्वारे व शेतकऱ्यांद्वारे तहसील कार्यालय, खंडाळा व जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा या ठिकाणी निवेदन देत खंडाळा तालुक्याला पाणी सोडण्याबाबत मागणी करण्यात आली होती. यावर जिल्हाधिकारी यांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना पाणी



सोडण्याबाबतच्या तोंडी सूचनाही दिल्या होत्या परंतु अद्यापपर्यंत पाणी सोडण्यात आले नसल्याने आज दि. २४ रोजी छत्रपती शिवाजी महाराज चौक, खंडाळा ते तहसील कार्यालय इथपर्यंत पायी मोर्चा काढत खंडाळा तहसील कार्यालयाबाहेर धरणे आंदोलन सुरू करण्यात आले आहे. याबाबत आंदोलनकर्त्यांना विचारणा केली असता पाणी सुटेपर्यंत धरणे आंदोलन सुरूच ठेवणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले तसेच लोकप्रतिनिधींच्या दुर्लक्षाने व प्रशासनाच्या मुर्दाड भूमिकेमुळे खंडाळकरांवर ही वेळ आल्याचे आरोप यावेळी करण्यात आले.

पाणी टंचाईची तीव्रता दिवसेदिवस (पान ५ वर)

# मतचाचण्यांची विश्वासार्हता

समाजवादी पक्ष, काँग्रेस, बहुजन समाज पक्ष, तृणमूल काँग्रेस आदी पक्षाने मतचाचण्यांवर बंदी घालण्याची मागणी केली होती. भारतीय जनता पक्षाने आता जरी विरोधी पक्ष पराभवाला घाबरले असून, मतचाचण्यांना विरोध करणे गैर असल्याचे म्हटले असले, तरी भाजपने अटलबिहारी वाजपेयी यांचे सरकार असताना मतचाचण्यांवर बंदी घालण्याची मागणी करणारा अध्यादेश आणण्याचा प्रयत्न केला होता, हे विसरता येणार नाही.

निवडणूक जाहीर झाल्यानंतर मतचाचण्या घेऊ नयेत, असे २००४ मध्ये सर्वपक्षीय बैठकीत ठरले होते; परंतु पुढे त्यावर काहीच झाले नाही. मतदार स्वतःच्या विवेकबुद्धीनुसार अंतिम निर्णय घेतो आणि अनेक वेळा अशा सर्वेक्षणांप्रमाणे जागरूक मतदार सर्वेक्षणकर्त्यांना आश्चर्यचकित करतो. 'ओपिनियन पोल' अनेकदा चुकीचे असतात हे खरे असले तरी काही वेळा ते बरोबरही असतात. २००९ मध्ये कोणत्याही सर्वेक्षणात काँग्रेसच्या पुनरागमनाचा अंदाज कुणीही व्यक्त केला नव्हता. २००४ मध्येदेखील भाजपच्या 'इंडिया' शायनिंग मोहिमेमुळे पुन्हा सत्तेत येईल अशी आशा व्यक्त केली होती पण तसे झाले नाही. भारतात निवडणुकीचा पहिला टप्पा पार पडला आहे. दुसऱ्या टप्प्याचे मतदान आणखी दोन दिवसांनी आहे. त्यानंतरच्या पाच टप्प्यानंतर निवडणुकीचा निकाल जाहीर होईल; परंतु त्याअगोदरच देशातील जनतेचा 'मूड' काय आहे हे सांगण्याची स्पर्धा लागली आहे. लोकसभेच्या निवडणुकीच्या सात-आठ महिने अगोदरपासून जनता कोणाला सरकार बनवण्याची संधी देणार याची सर्वेक्षणे वेगवेगळ्या संस्था करीत असतात. आता सेफॉलॉजी हे एक शास्त्र झाले असून आकडेवारीचे अभ्यासपूर्ण विश्लेषण केल्यास मतचाचण्यांत अचूकता येऊ शकते. मतचाचण्यांचे निष्कर्ष कुणालाच मान्य नसतात. उदाहरणच द्यायचे झाल्यास भारतीय जनता पक्षाला देशभरात ३७० च्या पुढे जागा मिळू शकतात, हा अंदाज भाजपला सुखावणारा असला, तरी महाराष्ट्र, कर्नाटकात जागा कमी होऊ शकतात, हे भाजपला मान्य नसते. तीच गोष्ट अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसची. राज्यात एकही जागा या पक्षाला मिळणार नाही, असे दोन पाहण्यांचे अंदाज असले, तरी या पक्षांना ते कदापि मान्य होण्याची शक्यता नाही. तिकडे ममता बॅनर्जी यांनी तर मतचाचण्यांवर विश्वास ठेवू नका, असे कार्यकर्त्यांना सांगितले आहे. देशभरात वेगवेगळ्या संस्था मतचाचण्या घेतात. वृत्तपत्र आणि चॅनेल्सही मतचाचण्या घेतात; परंतु या सर्वांवर आता भाजपच्या दावणीला बांधल्याचा आरोप होत असतो. राजकीय पक्षही वेगवेगळ्या संस्थांना सर्वेक्षण करण्याचे काम देतात. आता सर्वेक्षण करण्याच्या माध्यमातून मोठी उलाढाल होत असते. असे असले, तरी मतचाचण्यांमध्ये एकवाक्यता आढळत नाही. तसेच त्यांनी दिलेल्या आकड्यांची बेरीज केली, तर ती बऱ्याचदा निवडून द्यावयाच्या जागांपेक्षा जास्त होते. देशात मतचाचण्या कोणत्या वेळी घेतल्या जातात, किती लोकांची मते अजमावली जातात आणि प्रत्यक्ष मतदान किती होते, यावर मतचाचण्यांची अचूकता अवलंबून असते. त्यातच भारतीय जनमाणस वेगवेगळ्या पद्धतीने व्यक्त होत असते. साठ कोटी जनतेतून काही लाखांत लोकांची मते विचारात घेऊन केलेल्या मतचाचण्या कधी कधी चुकू शकतात; परंतु बऱ्याचदा त्यांच्या अंदाजाचा लोलक एका टोकाकडे जात असेल, तर या चाचण्यांच्या विश्वासार्हतेचा प्रश्न निर्माण होतो. अटल बिहारी वाजपेयी यांचे सरकार २००४ मध्ये पुन्हा येईल, असे सांगितले जात होते; परंतु प्रत्यक्षात मात्र भाजपचा या निवडणुकीत पराभव झाला. गेल्या वर्षी झालेल्या निवडणुकीत मध्य प्रदेशाबाबत जो अंदाज व्यक्त करण्यात आला होता, तो ही चुकीचा निघाला. तेलंगणात भारत राष्ट्र समितीचा पराभव होईल, असे फक्त एकाच ओपिनियन पोलमध्ये म्हटले होते.

लोकसभा निवडणुकीपूर्वी झालेल्या ओपिनियन पोलमध्ये पुन्हा एकदा भाजप पूर्ण बहुमताने सरकार स्थापन करत असल्याचे दिसत आहे. देशातील अनेक राज्यांमध्ये भाजप पुन्हा एकदा 'क्लीन स्वीप' करताना दिसत आहे. भाजप सत्तेत येईल, असे बहुतांश मतचाचण्यात म्हटले असले, तरी त्यांच्या जागांत किमान ४० जागांचा फरक दिसतो.

न्यूज १८ च्या मेगा ओपिनियन पोलमध्ये 'एनडीए' आघाडीला ४०० च्या आसपास जागा मिळतील, असे म्हटले आहे. उत्तर भारतातील राज्यांमध्ये तसेच दक्षिणेतील काही राज्यांमध्ये भाजपची गेल्या पाच वर्षांच्य तुलनेत चांगली कामगिरी होताना दिसत आहे. काही ओपिनियन पोलमध्ये भाजपला केरळमध्ये एकही जागा मिळणार नसल्याचे म्हटले आहे, तर काहींनी भाजपला तीन-चार जागा दाखवल्या आहेत. बहुतांश मतचाचण्यांत कर्नाटकमध्ये भाजपला गेल्या पाच वर्षांपूर्वीसारखी कामगिरी करता येणार नाही, असे म्हटले असले, तरी एका मतचाचणीत मात्र भाजपला 'इंडिया' आघाडीपेक्षा जास्त जागा दाखवल्या आहेत. 'सी व्होटर'ने 'एबीपी न्यूज'साठी केलेल्या सर्वेक्षणात 'एनडीए'ला सर्व जागांवर ४७ टक्के मते मिळण्याची शक्यता वर्तवली आहे, तर 'इंडिया' आघाडीला ४० टक्के मते मिळण्याची शक्यता आहे. इतरांना १३ टक्के मते मिळण्याची शक्यता आहे. या मतचाचणीत 'एनडीए'ला ३७३ जागा, 'इंडिया' आघाडीला १५५ जागा आणि इतरांना १५ जागा दाखवल्या आहेत. काहींनी तर 'इंडिया' आघाडीला नव्वदच्या आत आणून ठेवले आहे. देशात दोन टक्क्यांच्या फरकाने अनेकदा चमत्कार घडले आहेत. अशा परिस्थितीत सहा टक्के मतदान कमी झाले, तर कुणाला फटका बसणार याचा विचार मतचाचणी करताना केलेला दिसत नाही. न्यूज १८ च्या चाचण्यात भाजपच्या नेतृत्वाखालील 'एनडीए' ला लोकसभेच्या ४११ जागा दाखवल्या आहेत. तसे झाले, तर १९८४ मध्ये इंदिरा गांधी यांच्या हत्येनंतर राजीव गांधी यांच्या काळात काँग्रेसने मिळवलेल्या ४११ जागांची बरोबरी होईल. आगामी निवडणुकीत 'एनडीए'ची मतांची टक्केवारी ४८ टक्के असण्याची अपेक्षा आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पन्नास टक्क्यांहून अधिक मते मिळवण्याचा केलेला संकल्प पूर्ण होण्याचे संकेत कोणत्याच मतचाचणीतून व्यक्त होत नाहीत. लोकसभा निवडणुकीच्या प्रचाराची सुरुवात मोदी यांच्या 'अबकी बार - एनडीए ४०० पार' या घोषणेने झाली. 'एनडीटीव्ही' मतचाचणीत 'एनडीए'ला किमान ३७२ जागा मिळू शकतील, असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. 'एनडीए'च्या तुलनेत भारतातील 'इंडिया' आघाडीला १२२ जागा मिळू शकतात. 'एबीपी-सी व्होटर'च्या केलेल्या सर्वेक्षणानुसार, 'एनडीए'ला ३७३ जागा जिंकण्याची शक्यता आहे. 'इंडिया' आघाडीला १५५ जागा आणि इतर पक्षांना १५ जागा मिळण्याची शक्यता आहे. जसजशी निवडणूक जवळ येत आहे, तसतशी भाजपच्या जागांची संख्या वाढण्याचा अंदाज व्यक्त होत आहे.

मतचाचण्या घेण्यावर बंदी घालण्याचा आदेश द्यावा, अशी काँग्रेसची मागणी होती. एका दूरचित्रवाणी वाहिनीने केलेल्या स्टिंग ऑपरेशनमध्ये काही संस्था पैशासाठी चाचण्यांच्या निष्कर्षांमध्ये फेरफार करत असल्याचे आढळले. या ऑपरेशनमुळे अशा प्रकारच्या अकरा संस्थांचे पितळ उघडे पडले आहे, असा दावा या वाहिनीने केला होता. त्यामुळे लोकसभा निवडणुकांच्या वेळीदेखील हितसंबंधियांकडून अशा भानगडी होतील, अशी स्वाभविक शंका आली होती. मात्र एवढे होऊनही, निवडणूक आयोगाने या प्रकारांमध्ये हस्तक्षेप केला नव्हता. आजकाल अनेक दूरचित्रवाणी वाहिन्या या सरकारच्या हस्तक असल्यासारख्या वागत आहेत. आपला पक्ष जिंकणार आहे, असा निष्कर्ष एखाद्या चाचणीतून बाहेर आला, तर संबंधित पक्षाला त्यामुळे आनंद होतो. मात्र एरवी सर्वच राजकीय पक्षांनी जनमत चाचण्यांवर बंदी आणावी, अशीच मागणी केली आहे; मात्र जगातील बहुतेक देशांत जनमत चाचण्या होतच असतात. अर्थात मतदानाच्या आधी काही दिवस त्यावर निर्बंध आणले जातात. ब्राझील, तुर्कस्तान, पोलंड, फ्रान्स, इटली, कॅनडा या सर्व देशांमध्ये असे निर्बंध आणले जातात. अनेक चाचण्या या अपारदर्शक पद्धतीने घेतल्या जातात. कोणत्या पद्धती व प्रक्रियेने त्या घेण्यात आल्या आहेत, याची पुरेशी माहिती दिली जात नाही. अनेकदा मतदारांना प्रभावित करण्याचाच मूळ हेतू असतो. जेव्हा काँटे की टक्कर असते, तेव्हा तर मतचाचण्या घेऊन, त्यांच्या निष्कर्षांची जंगी प्रसिद्धी निवडून येण्याची शक्यता असलेला पक्ष करतो. १९९७ आणि २००४ साली सर्व राजकीय पक्षांनी एकमताने जनमत चाचण्यांवर बंदीची मागणी केली होती. २००८ साली 'एक्झिट पोल'वर बंदी आणण्याची मागणी करण्यात आली. निवडणूक आयोगात जाऊन एक बोलायचे आणि प्रत्यक्षात मात्र तसा कायदा करायचा नाही, हा राजकीय पक्षांचा दुटप्पीपणाच होता. खरे तर, 'प्रेस कौन्सिल'नेदेखील जनमत चाचण्यांच्या सच्चेपणाबद्दल शंका उपस्थित केली होती. वेगवेगळ्या मतदान चाचण्यांच्या निष्कर्षांमध्ये इतका मोठा फरक असतो, की कोणालाही त्याबद्दल शंका उपस्थित करावीशी वाटू शकते. म्हणूनच या क्षेत्राचा अनेक वर्षांचा अनुभव असलेले योगेंद्र यादव यांनी, कशा पद्धतीने चाचणी घेतली याची सर्व माहिती जनतेसमोर ठेवण्याची मागणी केली होती.

जनमत चाचण्यांचा प्रायोजक कोण आहे, किती लोकांच्या मुलाखती घेतल्या, त्या कोणत्या कालावधीत घेतल्या, मुलाखती घेणारे आणि त्याचा अन्वयार्थ लावणारे कर्मचारी प्रशिक्षित आहेत की नाहीत, ही सर्व माहिती लोकांना कळाली पाहिजे. ब्रिटनमध्ये ज्या पद्धतीने पोलिंग कौन्सिल आहे, तशा प्रकारची यंत्रणा भारतातही स्थापन करता येईल. ती या चाचण्यांचे नियामक प्राधिकरण म्हणून काम करू शकेल. मतदान चाचण्यांच्या प्रक्रियेची विश्वासार्हता प्रस्थापित करण्यासाठी या प्रकारचे पाऊल उचलणे अत्यावश्यक आहे. मतचाचण्या किंवा 'एक्झिट पोल'च्या अंदाजांना कधीही अंतिम निकाल मानले जाऊ नये कारण ते यशस्वी किंवा अयशस्वी होण्याची ५० टक्के शक्यता असते. काहीवेळा, राजकीय पक्ष आणि समीक्षकांच्या मते, ज्या एजन्सी या निवडणुका घेतात, त्यांच्या कार्यपद्धती, प्रश्नांची वेळ आणि/किंवा शब्दांची निवड या बाबतीत पक्षपाती असू शकतात. आधी सांगितल्याप्रमाणे, नमुन्याचा आकार हा एक मोठा घटक आहे आणि त्याशिवाय, समूहाचे लोकसंख्याशास्त्रीय वर्तन, आर्थिक परिस्थिती आणि इतर तत्सम घटकांवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले जाते.

- भागा वरखडे

# ३० तारखेला माळशिरस अकलुजचे रेकॉर्ड मोडेल

## जानकरांचा शेवटपर्यंत वाचवायचा प्रयत्न ..त्यांनी स्वाभिमान चरणावर ठेवला : आ.जयकुमार गोरे

**माळशिरस :** माढा लोकसभा मतदार संघाचे भाजपा ऊमेदवार रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांच्या प्रचारार्थ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची माळशिरस येथे ३० एप्रिल रोजी जाहीर सभा होणार आहे.या सभेसाठी एक लाख नागरीक ऊपस्थित राहुन अकलुजच्या सभेचे रेकार्ड मोडेल.असे सांगत जानकर मोहिते-पाटील यांचेकडे जाणार हे माहित होते.त्यांचा आमच्याशी होणारा घटस्फोट वाचवायचा शेवटपर्यत पर्यंत केला पण त्याचा उपयोग झाला नाही.मोडनिंब येथे झालेल्या शरद पवार यांच्या सभेत ऊत्तमरावांनी स्वाभिमान मोहिते-पाटील यांच्या चरणावर आपला स्वाभिमान ठेवल्याचे पाहुन वाईट वाटले असे खोचक वक्तव्य माण-खटावचे आमदार जयकुमार गोरे यांनी माळशिरस येथील पत्रकार परीषदेमध्ये केले.

भाजपा ऊमेदवार रणजितसिंह निंबाळकर यांच्या प्रचारार्थ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची दि.३० एप्रिल रोजी माळशिरस येथे जाहीर सभा होणार आहे.त्या पार्श्वभूमीवर आयोजीत पत्रकार परीषदेमध्ये आ.जयकुमार गोरे यांनी सभेविषयी माहिती दिली.तसेच सभेसाठी एक लाख नागरीक ऊपस्थित



राहुन २०१९ साली अकलुज येथे झालेल्या सभेचे रेकार्ड ब्रेक होईल असे सांगत मोहिते-पाटील व ऊत्तमराव जानकर यांच्या युतीवर जोरदार हल्ला चढवत थेट जानकर यांच्या स्वाभिमानाला डिवचले.

आ.गोरे म्हणाले की, देशात माढा मतदार संघ जास्त चर्चेत आहे.त्याचे कारण म्हणजे पवारांशिवाय माढ्यात काय होवु शकत नाही हा संभ्रम तोडत २०१९ मध्ये पवारांना विरोध होत रणजितसिंह निंबाळकर विजयी झाले.

विरोधी पक्षाचे सगळे लोक किंबहुना या देशातला विरोधी पक्षाचे सुद्धा सगळे नेते मान्य करतात की २०२४ ला मोदी हेच पुन्हा एकदा पंतप्रधान होणार आहेत असा विश्वास व्यक्त केला. तसेच मतदारप्रचाराच्या निमित्ताने मार्ग ३० तारखेला सकाळी ११ वाजता नरेंद्र मोदी यांची माळशिरस शहराच्या बाजूला कृषी विभागाच्या ५३ एकरपैकी २८ एकरामध्ये होणार्या सभेला साधारण एक लाख लोक येतील अंदाज व्यक्त केला.

यावेळी आ.जयकुमार गोरे यांना ऊत्तमराव जानकर यांचे मुद्यावरुन पत्रकारांनी छेडल्यानंतर गोरे यांनी शरद पवार,मोहिते-पाटील व जानकर यांना अतिशय मार्मिक शब्दबाण मारले..ते म्हणाले

आज मराठा समाजासाठी बोलणारे शरद पवार हे ४१ वर्षे सत्तेत होते एवढया वर्षांत त्यांनी मराठा समाजासाठी एक ही काम केले नाही.

ऊत्तमराव जानकर यांची नाराजी का हे समजु शकले नाही.ते आमचेकडे आले की आमच्यासारखे तर त्यांच्याकडे गेले की त्यांच्यासारखे बोलायचे.

ते अजितदादाकडे होते तरीही भाजपावर नाराजी होती.अजितदादा पक्षाकडे असल्यानंतर भाजप त्यांना ऊमेदवारी कशी देणार...?ते म्हणतात भाजपने फसविले पण ते भाजपमध्ये नव्हतेच तर भाजप त्यांची फसवणूक कशी करेल.

**जानकरांचे वाईट वाटले**

ऊत्तमराव जानकर हे माझे मित्र होते.लढवय्ये ,स्वाभिमानी नेते होते.त्यांना मोडनिंब येथील शर पवारांच्या सभेत बसायला खुर्ची नव्हती .त्यांची बसण्यासाठीची जागा पाहुन वाईट वाटले.ते जिथे बसले होते तिथे मोहिते-पाटलांचे पाय होते.जानकरांनी आपला स्वाभिमान मोहिते-पाटलांचे चरणावर ठेवला.

माढा लोकसभा मतदार संघातील माळशिरस तालुका एक विधानसभा मतदार संघ आहे.असे पाच मतदार संघ माढा लोकसभा मतदार संघात येतात.फक्त एकटे जानकर गेले तरी काळजी करण्याचे कारण नाही .आमचेकडे बबनदादा शिंदे ,संजय मामा शिंदे ,दिपकआबा साळुंखे ,करमाळ्याच्या बागलताई,सोबत आहेत.तसेच धनगर समाज जानकरांना सोडुन भाजपकडे आहे.आज जानकर गेले ऊद्या आमचेकडे धवलसिंह मोहिते-पाटील येवु शकतात. त्यामुळे आगे--आगे देखो होता है क्या ..? काहीही झाले तरी माढ्यात आमचाच विजय. त्यावेळी भाजपचे आप्पासाहेब देशमुख राजकुमार पाटील के के पाटील हंनुमंत सुळ सोपान नारनवर उपस्थित होते.

# वाशिमच्या नीलकृष्ण गजरे याची जेईई मेनमध्ये दुसऱ्यांदा अव्वल कामगिरी

**मुंबई :** जेईई-मेनच्या पहिल्या सत्राबरोबरच दुसऱ्या सत्रातही वाशिमच्या नीलकृष्ण गजरे याने १०० पर्सेंटाईल मिळवत अव्वल कामगिरी केली आहे. देशभरातून ५६ विद्यार्थ्यांनी १०० पर्सेंटाईल मिळविले आहेत. यात महाराष्ट्रातील सात विद्यार्थी आहेत.

नीलकृष्णचे वडिल शेतकरी आहेत. त्याच्या कोचिंगसाठी तेही नागपूरला त्याच्यासोबत राहिले आहे. महत्त्वाचे म्हणजे जानेवारीत झालेल्या जेईई-मेनच्या पहिल्या सत्रातही नीलकृष्णने १०० पर्सेंटाईल मिळविले होते. जेईई-मेन वर्षातून दोन वेळा घेतली जाते.

दहावीच्या परीक्षेत ९७ टक्के गुणांनी उत्तीर्ण झालेला नीलकृष्ण आता जेईई-ॲडव्हान्सच्या तयारीला लागला आहे. मुंबई आयआयटीत कम्प्युटर सायन्सला प्रवेश मिळविणे हे त्याचे ध्येय्य आहे.

अकरावीला त्याने जेईईच्या तयारीला सुरूवात केली. दहावीच्या तुलनेत अभ्यासाचा व्याप खूप वाढला होता. त्यामुळे सुरवातीला दडपण आले. परंतु, आपण प्रयत्न सोडले नाहीत. असे दडपण आले तरी आपली अभ्यासाची तयारी सोडायची नाही, असा सल्ला त्याने विद्यार्थ्यांना दिला आहे.

नवी मुंबईतील दक्षेश मिश्रा याने देशभरातून दुसरा रँक मिळवला आहे. तर हरियाणाचा आरव भट हा विद्यार्थी देशातून तिसऱ्या क्रमांकावर आहे. मुलींमधून कर्नाटकाची सानवी जैन आणि दिल्लीची शायना सिन्हा यांनी १०० पर्सेंटाईल मिळविले आहेत.

मुंबईतील आर्यन प्रकाश यानेही दुसऱ्यांदा




१०० पर्सेंटाईल मिळवण्याची कामगिरी केली आहे. अंधेरी येथे राहणाऱ्या आर्यनचे आई-वडील आयकर अधिकारी आहेत. परंतु त्याला भौतिकशास्त्र आणि गणिताची आवड आहे.

**दोन हजार विद्यार्थ्यांचे निकाल रोखले**

नॅशनल टेस्टिंग एजन्सीने दोन हजाराहून अधिक विद्यार्थ्यांचे निकाल रोखून धरले आहेत. सत्र एक आणि दोन अशा दोन्ही परीक्षा देताना ज्यांनी नवीन नोंदणी क्रमांक तयार केले, त्यांचे निकाल रोखून धरण्यात आले आहेत. एनटीए या विद्यार्थ्यांशी ईमेद्वारे संपर्क साधणार आहे. दोन नोंदणी क्रमांक एकाच विद्यार्थ्याचे असल्याची खात्री केल्यानंतर त्यांचे निकाल जाहीर केले जातील. दरम्यान विश्वासभंग केल्यामुळे १३ विद्यार्थ्यांना जेईई मेन घेण्यापासून कायमचे प्रतिबंधित करण्यात आले आहे.

पहिल्या सत्राला बसलेले विद्यार्थी - ११,७०,०४८

दुसऱ्या सत्राला बसलेले विद्यार्थी - १०,६७,७५९

दोन्ही सत्राला बसलेले विद्यार्थी - ८,२२,८९९

# सरकारी यंत्रणांवर दबाव आणणाऱ्यांविरुद्ध मतदान करावे' निवडणुक आयोगाने नि:पक्षपाती राहावे

## 'भारत जोडो अभियान' आणि सामाजिक संघटनांचे आवाहन

**पुणे :** सरकारी यंत्रणा आणि निवडणूक आयोगासारख्या स्वायत्त संस्थांवर दबाव आणून लोकशाहीविरोधी निर्णय घेण्यास भारतीय जनता पक्ष भाग पाडत असल्याने लोकसभा निवडणूक निःपक्षपाती वातावरणात पार पडेल की नाही,याविषयी शंका निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांनी संविधान वाचविण्यासाठी भाजपाविरोधी मतदान करावे,असे आवाहन विविध सामाजिक संघटनांच्या वतीने पुण्यात पत्रकार परिषदेत करण्यात आले.

'भारत जोडो अभियान'च्या वतीने पुणे श्रमिक पत्रकार संघ येथे आयोजित पत्रकार परिषदेत संदीप बर्वे(युवक क्रांती दल),इब्राहिम खान(भारत जोडो अभियान),प्रशांत कोठडीया (संवैधानिक राष्ट्रवाद मंच),उत्पल व.बा.(निर्भय बनो),प्रसाद झावरे(पुणे कलेक्टिव्ह ) श्रीरंजन आवटे, उमेश ठाकूर , एकनाथ पाठक हे उपस्थित होते.

या पत्रकार परिषदेत लोकसभा निवडणूक जाहीर होण्याआधी आणि जाहीर झाल्यानंतर घडलेल्या घटनांची माहिती देऊन देशातील यंत्रणांवर भाजपचा प्रचंड दबाव असल्याचे स्पष्ट करण्यात आले.निवडणूक लोकशाही मार्गाने,निःपक्षपाती पणे आणि भयमुक्त वातावरणात व्हायला हवी,या मूलभूत




अपेक्षेला भाजपकडून नख लावले जात आहे. मॅच फिक्सिंग करण्याचे प्रयत्न होत आहेत म्हणून साऱ्यांनी जागरूक असावे आणि भाजप कोणत्याही थराला जाऊ शकते, हे लक्षात घेऊन सावध रहावे,असे या पत्रकार परिषदेत सांगण्यात आले. सर्व सामाजिक संघटना एकत्र येवून आघाडी करून प्रत्येक मतदार संघात इंडिया आघाडीला किमान २ लाख मतदान वाढेल यासाठी कार्यरत असल्याची माहिती देण्यात आली.

*देशाला आणि निवडणुकीला संकटात टाकणारा घटनाक्रम*

१. सुरतमध्ये भाजपचा लोकसभेचा उमेदवार विजयी घोषित करण्यात आला आहे. इतर आठ उमेदवारांची नामांकनं रद्द करण्यात आली आहेत. विरोधी पक्षाच्या उमेदवारांची पात्रता, नामांकनं रद्द होण्याचा प्रकार अनेक ठिकाणी घडला आहे.

२. अरविंद केजरीवाल यांना जीवे मारण्याचा प्रयत्न होतो आहे. असा आरोप केजरीवाल यांच्या पत्नीने केला. मुख्यमंत्री केजरीवाल यांना आचारसंहिता सुरू झाल्यावर अटक करण्यात आली. हा आचारसंहितेचा भंग होता. त्या आधी झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांनाही अटक झाली.

३. काँग्रेसची बँक खाती गोठवण्यात आली. त्यांना १८२३ कोटींचा दंड केला. त्यासाठी ३० वर्षांपूर्वीचं प्रकरण काढलं गेलं. कम्युनिस्ट पार्टीला केवळ जुनं पॅनकार्ड वापरलं म्हणून ११ कोटींचा दंड केला गेला.

४. तृणमूल काँग्रेसच्या नेत्यांना इन्कम टॅक्स विभागाच्या नोटिसा आल्या आहेत. एकट्या साकेत गोखले या खासदारास ११ नोटिसा आल्या आहेत. तृणमूलच्या खासदादारांना, नेत्यांना पोलिसांनी ताब्यात घेऊन त्रास देण्याचा प्रयत्न केला, असे गोखले यांनीच सांगितले.

५. राजस्थानमधील सभेत प्रधानमंत्री महोदयांनी थेट मुस्लिम विरोधी वक्तव्य केले. आचारसंहितेचा हा भंग असून निवडणूक आयोगाने त्यांच्यावर काहीही कारवाई केलेली नाही.

६. आचारसंहिता लागू झाल्यावर प्रधानमंत्री महोदयांनी विकसित भारताविषयी पत्र पाठवले. हा आचारसंहितेचा भंग होता. आयोगाने हे मान्य केले पण कोणतीही कारवाई केली नाही. मुळात लाखो लोकांचे पर्सनल नंबर प्रधानमंत्र्याकडे कसे आले आणि प्रायव्हसीचे काय झाले, हे आणखी काही प्रश्न.

७. आंध्र प्रदेश मध्ये सरकारी विमान वापरून प्रधानमंत्री प्रचारासाठी गेले. हाही आचारसंहितेचा भंग होता. अशी अनेक उदाहरणे आहेत. निवडणूक आयोग त्यावर काहीही कारवाई करत नाही.

८. व्हीव्हीपॅट यंत्रावर १०० टक्के ईव्हीएम मतदानाची पडताळणी करण्याच्या संदर्भात निवडणूक आयोग अनुत्सुक आहे. सर्वोच्च न्यायालयाने हा निर्णय राखीव ठेवलेला आहे. लोकांना आयोगावर विश्वास नसल्याचे चित्र आहे.

९. चार दिवसांपूर्वी पश्चिम बंगालमध्ये भाजप नेत्याच्या घरात बॉम्ब सापडला. या आधी कर्नाटकमधील बंगलोरमधील कॅफेतल्या बॉम्बस्फोटात भाजप कार्यकर्त्यास अटक झाली आहे. लोकांचा कौल पाहता भाजप कोणत्याही थरास जाऊ शकते, हे या निमित्ताने लक्षात येते.

१०. मुळात निवडणूक आयोगाच्या आयुक्तांच्या निवडीतून सरन्यायाधीशांना वगळले आहे. एका आयुक्तांनी अचानक निवडणूक जाहीर होण्याच्या उंबरठ्यावर राजीनामा दिला आणि निवडणुकीची घोषणा होण्यापूर्वी दोन नव्या आयुक्तांची नेमणूक प्रधानमंत्री महोदयांनी जातीने लक्ष घालून केली आहे.

आयोगाने तटस्थ अंपायर असले पाहिजे. मॅचफिक्सिंग करता कामा नये, एवढी माफक अपेक्षा होती. वरील सारे मुद्दे आयोगाच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित करतात. त्यामुळे मतदारांनीच याविरोधात मतदान करावे,आणि भाजपला हरवून ताळ्यावर आणावे,असे आवाहन या पत्रकार परिषदेत करण्यात आले.

मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश व्ही. देसाई यांनी सरस्वती प्रिंटिंग प्रेस, १६ मंगळवार पेठ, सातारा येथे मुद्रित करून, रामकमल बिल्डिंग, ७, रामकृष्ण कॉलनी, सिव्हिल हॉस्पिटल रोड, सातारा येथून प्रकाशित केले. संपादक : नरेश व्ही. देसाई. फोन : ९९६०३५०९९९, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : ७२१०५/९९
Owner, Printer, Publisher Naresh V. Desai. Printed at Saraswati Printing Press, 16 Mangalwar Peth, Satara. Published from Ramkamal Building, 7, Ramkrishna Colony, Civil Hospital Road, Satara. Editor : Naresh V. Desai. Phone : 9960350999, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : 72105/99

# पुणे-नाशिक महामार्गावरील रोहकल फाट्यावर वाहतुकीचा बोजवारा



## वाहतूक पोलीस व सिग्नल यंत्रणा नसल्याने वाहतुकीचा उडतोय सावळा गोंधळ

**चाकण / प्रतिनिधी**

पुणे-नाशिक महामार्गावर भाम नदीजवळ रोहकल फाटा आणि एम.आय.डीसी.कडे जाणारी वाहने तसेच एम .आय. डी. सी.कडून येणारी वाहनांमुळे महामार्गावर वाहतूक कोंडी झाली होती. यामुळे पुणेकडून येणाऱ्या वाहनांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागला. शिवाय या चौकामध्ये मोठमोठे चार चार गतिरोधक टाकल्यामुळे वाहतूक कोंडी नेहमीचीच व्हायला लागली आहे.

याच चौकात आता फळे व्यावसायिकांनी चागंलाच जोर धरल्याने, त्यांची संख्या दिवसेंदिवस वाढतच चाललेली असून, त्यांना कोणाचा आशिर्वाद असेल हेही सांगण्याची आवश्यकता नाही, परंतु या फळ व्यावसायिकांमळे फळे खरेदी करणारे वाहन चालक सुद्धां रस्त्यावरच वाहने उभी करून फळे खरेदी करत असल्याने येथे आता कायमच गौंगाट ऐकायला मिळत आहे. त्यात आणखी भर म्हणजे हे फळे व्यावसायिक आता सर्रास भोंगा लावून मालाची विक्री करत आहेत. त्यांच्या या भोंग्यांच्या आवाजाने वाहनचालकांची तंद्री भंग होत असल्याचे चित्र पहायला मिळत आहे आणि काल या चौकात सकाळी १०.३० वा. दरम्यान वाहतूक नियंत्रकच नाही, सिग्नल यंत्रणा कार्यान्वित नाही, यामुळे वाहनचालक वाकड्या तिकडया गाड्या चालवून वाहतुकीचा पार बोजवारा उडत आहे.

या वाहतूक कोंडीमुळे इतर वाहनचालकांना, महत्त्वाच्या कामासाठी जाणाऱ्या प्रवाशांना नाहक त्रास सहन करायची वेळ मात्र नक्कीच आलेली असते. पुढील काळात इथे किमान बारा चौदा तास वाहतूक विभागाची यंत्रणा आवश्यक आहे, असे वाहतूक कोंडीत सापडलेल्या वाहनचालकांकडून सूचविण्यात आले आहे.

# महाराष्ट्र राज्य अखिल माथाडी आणि जनरल कामगार संघटनेची राजगुरूनगर येथे बैठक संपन्न

**चाकण : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य अखिल माथाडी आणि जनरल कामगार संघटनेची बैठक संघटनेचे कार्याध्यक्ष रविंद्र वाळुंज यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.

याप्रसंगी उपस्थित पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करताना संघटनेचे राज्य कार्याध्यक्ष रवींद्र वाळूंज बोलताना म्हणाले, देशात अग्रगण्य असणारी चाकण औद्योगिक वसाहतीचा वाढता विस्तार पाहता अनेक नवनवीन कंपन्या खेड तालुक्यात येत आहेत. ही खेड तालुक्यातील स्थानिक तरुणांसाठी चांगली संधी उपलब्ध होत आहे. या औद्योगिक वसाहतीत बहुतेक कंपन्यांमध्ये स्थानिक कामगार कमी आणि परराज्यातील कामगार मोठ्या प्रमाणात असल्याचे चित्र पहायला मिळत आहे. त्यामुळे स्थानिक तरुण रोजगारापासून वंचित रहात आहे आणि यासाठी विविध कामगार संघटना एकत्र येऊन स्थायिक तरुणांसाठी रोजगार उपलब्ध व्हावा, कंपनी कायद्याप्रमाणे त्यांना विविध सोयी सवलती उपलब्ध व्हाव्यात यासाठी कामगार संघटनेच्या माध्यमातून कायम प्रयत्नशील आहेत.

ही एक राज्यस्तरीय कामगार संघटना महाराष्ट्र राज्याच्या प्रत्येक जिल्ह्यात कार्यरत असून ज्या ठिकाणी औद्योगिक वसाहत असेल तिथे स्थानिक कामगारांच्या हितासाठी प्रयत्न करत असते आणि याचाच एक भाग म्हणून खेड तालुक्यातील औद्योगिक वसाहतीत नवीन कंपन्यांना भेटी देऊन माथाडी कामगारांची गरज स्थानिकांना रोजगार यासाठी प्रयत्न करण्याच्या विचारात असल्याने नवीन कार्यकारिणी तसेच जुन्या पदाधिकाऱ्यांची फेरनिवड करण्यासाठी आजची बैठक आयोजित करण्यात आली होती.

या बैठकीस खेड तालुकाध्यक्ष आकाश डोळस, उपाध्यक्ष रवींद्र नरोडे, सचिव बाजीराव घुले, बंटी घुले, सरचिटणीस विजयकुमार जेठे तसेच पुणे जिल्ह्यातील विविध पदाधिकारी उपस्थित होते.

### 'सब का साथ, सब का विकास' हे मोदीजींचे स्वप्न साकार करण्यासाठी

# महायुतीस मतदान करा - आमदार चेतन तुपे

## नेताजी सुभाषचंद्र कार्यालयात महायुतीचा सर्वपक्षीय मेळावा

**हडपसर : प्रतिनिधी**

सर्व जातींना व धर्मांना सोबत घेऊन सब का साथ सब का विकास हे पंतप्रधान नरेंद्र मोदींजीचे स्वप्न साकार करण्यासाठी , देशाच्या विकासासाठी , जगामध्ये देशाला महासत्ता बनविण्यासाठी , नरेंद्र मोदींना पंतप्रधान पुन्हा करायचे आहे, लोक खोट्या अफवा पसरवित आहेत की, संविधान बदलणार जोपर्यंत सुर्य चंद्र आहे तोपर्यंत देशाची घटना बदलणार नाही , संविधान सुरक्षित राहाणार आहे , मोदी पंतप्रधान देशात अनेक विकासाच्या योजना आणल्या आज देश




प्रगतीपथावर आहे.मोदींना साथ देण्यासाठी देशाच्या विकासासाठी महायुतीच्या उमेदवारांनाच मतदान करा , शिरूर लोकसभेसाठी राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाकडून शिवाजी आढळराव पाटील उमेदवार असून त्यांना निवडून आणण्याची जबाबदारी आपली आहे तरी आपण सर्वांनी महायुतीला मतदान करा असे आवाहन हडपसर आमदार चेतन तुपे यांनी हडपसर मधील नेताजी सुभाषचंद्र कार्यालयात महायुतीचा सर्व पक्षीय मठहामेळावा आयोजित करण्यात आला होता यावेळी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष सुरेश घुले , माजी आमदार योगेश टिळेकर, अक्षय आढळराव पाटील,माजी महापौर राजलक्ष्मी भोसले, शिवसेना शहर प्रमुख प्रमोद भकनगिरे,वैशाली बनकर, माजी नगरसेवक अशोक कांबळे, आबा तुपे, माजी नगरसेविका उज्वला जंगले, चंद्रकांत कवडे, विकास रासकर, जीवन जाधव, मनसे अध्यक्ष साईनाथ बाबर, बाबू वागसकर, शशीकला वाघमारे,माजी सरपंच शिवराज घुले राष्ट्रवादी हडपसर अध्यक्ष शंतनु जगदाळे ,भाजप अध्यक्ष संदिप दळवी, रिपाइं हडपसर अध्यक्ष महादेव दंदी,विशाल मते, अभिजीत बोराटे, भाजप, राष्ट्रवादी, शिवसेना , मनसे, रिपाइं , महायुतीतील प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# शिक्षण महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांना 'भारतरत्न' द्यावा

## विशाल शेवाळे यांचे मत; डीसीएम सोसायटीमध्ये विठ्ठल रामजी शिंदे यांना अभिवादन

**हडपसर / प्रतिनिधी**

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी अस्पृशता निवारणाचे काम हाती घेतले. समाजात शिक्षणाचा प्रसार घडवून आणणारे, अस्पृश्यांना नोकरीची संधी मिळवून देणे. त्यांच्या अडचणी सोडवणे, त्यांना चांगले शिक्षण देणे, त्यांच्या प्रगती आणि ज्ञानाची ताण निर्माण करणे यासाठी त्यांनी १८ ऑक्टोबर १९०६ रोजी डिप्रेस्ड क्लासेस मिशन स्थापना केली. अस्पृश्यता निवारणाचे शिलेदार महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे अफाट कार्य होते. महर्षी विठ्ठल शिंदे यांनी सर्व समाजासाठी प्रचंड काम केले आहे विशेषता तळागाळातील वंचित, दिनदलित, कष्टकरी,बहुजन वर्गासाठी त्यांनी अहोरात्र प्रामाणिक परिश्रम घेतले आहे, अशा महान शिक्षण महर्षींना भारत सरकारने मरणोत्तर 'भारतरत्न' पुरस्कार प्रदान करण्यात यावा, असे मत संस्थेचे जनरल सेक्रेटरी विशाल शेवाळे यांनी व्यक्त केले.

डीसीएम सोसायटी ऑफ इंडिया या ऐतिहासिक संस्थेचे संस्थापक, शिक्षण महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचा एकशे पन्नासावा सुवर्ण महोत्सवी जयंती कार्यक्रम अहिल्याश्रम, नाना पेठ पुणे येथे संपन्न झाला. शिंदे यांच्या प्रतिमेस




पुष्पहार अर्पण डीसीएम सोसायटी ऑफ पुणेचे अध्यक्ष डी.टी.रजपूत व जनरल सेक्रेटरी विशाल शेवाळे यांनी करून अभिवादन केले.

यावेळी संस्था प्रतिनिधी काजल शेवाळे, वर्षा पाटील, मुख्याध्यापिका शिल्पा भोसले, प्राचार्य डॉ. भारती सहस्त्रबुद्धे,डॉ. नरेश पोटे, वैभव इभाड, देशमुख सर, बर्डे सर, सुनिता भोसरेकर, डॉ.तेजपाल कांबळे, डॉ. प्रवीण कांबळे, प्रा.रणजीत देशमुख, किशोर भुजबळ, प्रा. बाळासाहेब सोनवणे शिक्षक, कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी जयंती निमित्ताने विविध स्पर्धेमध्ये उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवणाऱ्या व विजेत्या स्पर्धकांना प्रशस्तीपत्र व बक्षीस वितरण करण्यात आले.

# कावड दिंडी यात्रेचे वळती येथे उत्साहात स्वागत

**वळती/प्रतिनिधी**

सातारा जिल्ह्यातील शिखर - शिंगणापूर येथे राज्यातील कानाकोपऱ्यातून भाविक मोठ्या संख्येने येत असतात . या कावड दिंडीच्या प्रवासात दिंडीतील भाविक भक्तांचे उत्साहात स्वागत केले जाते.

औरंगपूर (जि. अहमदनगर ) ते शिखर शिंगणापूर (जि.सातारा ) या कावड दिंडी यात्रेतील भाविक आता परतीच्या मार्गावर आहेत.या भाविकांना अन्नदान करण्याची अनेक वर्षांची परंपरा आज वळती (ता आंबेगाव ) गावातील भोर कुटुंबियांनी आजही जतन केली आहे.



औरंगपूर (जि. अहमदनगर ) ते शिखर शिंगणापूरला कावड दिंडी खांद्यावर घेऊन भाविक भक्त जात असतात.पंधरा दिवसांचा हा दिंडी सोहळा असतो . यामध्ये शेकडो वारकरी सहभागी असतात . सध्या ही कावड दिंडी परतीच्या मार्गावर आहे. वळती येथे गुरुवारी ( दि.२४) रोजी सकाळी कावड दिंडीचे स्वागत ग्रामस्थांनी केले . येथील (स्व) गेणभाऊ सावळेराम भोर यांच्या निवासस्थानी दिंडी सोहळ्याने विसावा घेतला. यावेळी भोर कुटुंबीयांच्या वतीने गेली अनेक वर्षापासून या पायी दिंडी सोहळ्यातील भाविक , वारकऱ्यांना अन्नदान केले जाते. सकाळी दहा वाजता सामूहिक आरती झाली. त्यानंतर भाविक , वारकऱ्यांना अन्नदान करण्यात आले.

# बारणे यांच्या हॅट्ट्रिकसाठी मनसे पूर्ण ताकदीनिशी प्रचार करणार - नितीन सरदेसाई

## ▪ खासदार बारणे यांना विक्रमी मताधिक्याने विजयी करणार

**खोपोली :** महाराष्ट्र सैनिकांसाठी राज साहेब ठाकरे यांचा शब्द अंतिम असतो. त्यांच्या आदेशानुसार मावळ लोकसभा मतदारसंघातून महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांच्या हॅट्ट्रिकसाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेना पूर्ण ताकतीनिशी प्रचारात उतरेल, अशी ग्वाही मनसेचे नेते नितीन सरदेसाई यांनी दिली.

मावळ लोकसभा मतदारसंघातील शिवसेना- भाजप- मनसे- राष्ट्रवादी- आरपीआय- रासप व मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांच्या प्रचारासाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची समन्वय बैठक खोपोली येथील युके रिसॉर्टमध्ये आयोजित करण्यात आली होती. त्यात ते बोलत होते. बैठकीस खासदार बारणे, आमदार महेंद्र थोरवे, महाराष्ट्र नवनिर्माण चित्रपट सेनेचे प्रमुख अमित खोपकर, मनसेचे वरिष्ठ पदाधिकारी रणजीत शिरोळे, जिल्हाप्रमुख जितेंद्र पाटील, शिवसेना जिल्हाप्रमुख संतोष भोईर, मनसेचे पिंपरी- चिंचवड शहराध्यक्ष सचिन चिखले तसेच विजय पाटील, योगेश चिले व मनसेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सरदेसाई म्हणाले की, राज साहेबांच्या आदेशानुसार




आम्ही महायुतीचा प्रचार पूर्ण ताकतीनिशी करणार आहोत. निवडणूक झाल्यानंतर महायुतीच्या खासदारांनी पक्षीय दृष्टिकोन बाजूला ठेवून विकासाची कामे करावीत, एवढीच महाराष्ट्र सैनिकांची अपेक्षा आहे.

राज ठाकरे यांचा निर्णय दूरदृष्टीचा आहे, असे मत आमदार थोरवे यांनी व्यक्त केले. शिवसेना आणि मनसे यांची विचारधारा एकच आहे. बाळासाहेब ठाकरे यांचा विचार घेऊनच दोन्ही पक्ष काम करीत आहेत. दोन्ही पक्षांमध्ये काही मतभेद असले तरी मनभेद कधीच नव्हते, असेही ते म्हणाले.

खासदार बारणे म्हणाले की, मी संघर्षातून पुढे आलो आहे. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाल्यानंतर शासकीय योजना अधिक प्रभावीपणे लोकांपर्यंत पोहोचवता आल्या. नरेंद्र मोदी पुन्हा पंतप्रधान व्हावेत, ही देशातील जनतेची भावना आहे. त्यामुळे महायुतीला बिनशर्त पाठिंबा देण्याचा राज ठाकरे यांचा निर्णय महत्त्वपूर्ण आहे.

निवडणुकीनंतरहीसमन्वयाच्या भूमिकेतून पुढील काम करू व मनसेला दिलेला शब्द पाळू, अशी ग्वाही देखील खासदार बारणे यांनी दिली.

# मारहाणप्रकरणी आठ जणांवर गुन्हा

**राजदंड / सातारा**

सातारा शहरातील मतकर कॉलनी येथे आई, फिर्यादी व मुलाला मारहाण केल्याप्रकरणी पाच महिलांसह ८ जणांवर शाहूपुरी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. दि. २२ रोजी दुपारी १२ वाजता हा प्रकार घडला.

अलका दत्तात्रेय भोसले (वय ४५, रा. मतकर कॉलनी, शाहूपुरी, सातारा) यांनी फिर्याद दिली आहे.

आक्कू बुरुंगले, गणेश बुरुंगले, अनिता भोसले, मस्कू बुरुंगले, शुभम बुरुंगले, पूजा बुरुंगले, चांदणी बुरुंगले, लाली बुरुंगले (सर्व रा. मतकर कॉलनी) यांच्या विरोधात मारामारीचा गुन्हा दाखल झाला आहे. पोलीस हवालदार भाकरे तपास करत आहेत.

# निवडणूक पोलीस निरीक्षकांची नियुक्ती

**राजदंड न्यूज नेटवर्क**

**पुणे :** जिल्ह्यातील ३४- पुणे लोकसभा मतदार संघाच्या निवडणुकीसाठी भारत निवडणूक आयोगाकडून निवडणूक पोलीस निरीक्षकांची नियुक्ती करण्यात आली असल्याची माहिती पुणे लोकसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी दिली आहे.

निवडणूक पोलीस निरीक्षक म्हणून ज्योती नारायण यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांचा निवासाचा पत्ता व्हीव्हीआयपी विश्रामगृह, पुणे येथील कक्ष क्रमांक ए-३०५ असा आहे. श्री. ज्योती नारायण यांचा संपर्क क्रमांक ९८११७५५४३९ व ०२०-२९९९७४३१ असा असून त्यांचा ईमले आयडी policeobserver34pune@gmail.com असा आहे. निवडणूक पोलीस निरीक्षक यांचे संपर्क अधिकारी विवेक पाडवी यांचा संपर्क क्रमांक ९८२३६६००७४ असा आहे. श्री.ज्योती नारायण हे सकाळी १०:३० ते ११:३० या वेळेत भेटतील, असे पुणे लोकसभा मतदार संघ निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयातून कळविण्यात आले आहे.

# 'संयुक्त जयंती भीम फेस्टिव्हल २०२४'चा समारोप




**पुणे :** आदर्श प्रकाशमय सामाजिक सेवा संस्था आयोजित 'संयुक्त जयंती भीम फेस्टिव्हल २०२४' चा समारोप बुधवार,दि.२४ एप्रिल रोजी सायंकाळी झाला.

यावेळी संस्थापक अध्यक्ष अजय भालशंकर, उत्सवप्रमुख सचिन गजरमल, कार्याध्यक्ष स्नेहा गायकवाड, राहुल दहिरे, अनिता शिंदे, वर्षा जाधव, भारती वांजळे विष्णू शेवाळे, प्रवीण चौधरी,राहुल रिकेबी ,रवी वाघमारे,आदर्श भालशंकर,मंथन भालशंकर उपस्थित होते.

या पाच दिवसीय महोत्सवाला राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार गटाचे नेते आ. रोहित पवार, रिपब्लिकन पक्षाचे सतीश गायकवाड, संविधान ग्रुप चे राकेश सोनावणे, डॉ. संग्राम साळवे आदी मान्यवरांनी भेटी देवून महामानवांना अभिवादन केले. गौतम बुद्ध, छत्रपती शिवाजी महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले अशा सर्व महामानवाच्या विचारांचा प्रसार या फेस्टिवल मध्ये करण्यात आला. वारजे पूल येथे या फेस्टिवल चे कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. या सर्व कार्यक्रमांना चांगला प्रतिसाद मिळाला.

# बाल चित्रपट महोत्सवाचे सर्वत्र आयोजन केले पाहिजे : महेश कोठारे

**राजदंड न्यूज नेटवर्क**

**पुणे :** बालचित्रपट मोहोत्सव सर्वत्र आयोजित करणे महत्वाचे आहे कारण चित्रपट बघूनच मुले खूप शिकत असतात. इंग्रजी माध्यमात शिक्षण घेणाऱ्या मुलांनी देखील असे मराठी चित्रपट बघितले पाहिजेत माझे बहुतेक चित्रपट प्रौढांबरोबर लहान मुलांनी देखील जास्त बघितले ही आनंदाची बाब आहे. बाल चित्रपट म्हणजे त्यात लहान मुले असलीच पाहिजे अस नाही विषय व मांडणी महत्वाची असते असे प्रतिपादन अभिनेते महेश कोठारे यांनी केले.

पुण्यात १९ ते २५ एप्रिल या कालावधीत सिटी प्राईड कोथरूड येथे संपन्न झालेल्या बाल चित्रपट मोहोत्सवाची सांगता अभिनेते महेश कोठारे यांच्या हस्ते आज झाली त्यावेळी ते बोलत होते.

'संवाद पुणे' तर्फे आयोजित या



बाल चित्रपट मोहोत्सवाच्या सांगता समारंभात जेष्ठ कवी रामदास फुटाणे यांच्या हस्ते अभिनेते महेश कोठारे यांचा सत्कार करण्यात आला. बालकलाकार ते अभिनेता हा प्रवास केल्याबद्दल महेश कोठारेंचा हा सत्कार करण्यात आला. तसेच यावेळी मंदार जोशी यांनी लिहिलेले 'डॅम इट आणि बरंच काही'... या महेश कोठारे यांच्या आत्म चरित्रावर असलेल्या पुस्तकाचे 'स्टोरीटेल' ऑडियो ॲपमध्ये प्रकाशन करण्यात आले.

यावेळी स्टोरीटेलचे प्रसाद मिराजदार म्हणाले की,'स्टोरीटेल' मध्ये स्वतः चे आत्मचरीत्र्य स्वतःच त्या व्यक्तीने वाचले आहे असा 'स्टोरीटेल' मधील हा पहिलच प्रयोग आहे.

यावेळी रामदास फुटाणे म्हणाले, मुलांनी घरात मराठीतच बोलले पाहिजे, मुलांना पालकांनी मराठी बालनाट्ये, बाल चित्रपट दाखवले पाहिजेत. आपल्याला इंग्रजी चांगले आलेच पाहिजे पण मराठीचा बळी देऊन ते घरात येता कामा नये. पुढे ते म्हणाले आजोबा नाचू लागले आणि आजी नाचू लागली अन शेमाडी नातवंडे इंग्रजी वाचू लागली,नातू नाचू लागला नात नाचू लागली आणि रोजची इंग्रजीची रद्दी घरी साठू लागली,अजाण मुळाखाली माती नाचू लागली आणि इंग्रजीच्या डोहाला पोथी टोचू लागली.

या मोहोत्सवात दाखवल्या गेलेल्या सात चित्रपटांपैकी चार चित्रपट अजून रिलीज देखील झाले नाहीयेत त्यांचा प्रीमियर आता झालाय आणि त्या चित्रपटांचा मुलांनी आणि पालकांनी मनसोक्त आनंद घेतला आहे तसेच या चित्रपटांमध्ये दाखवण्यात आलेल्या चित्रपटांपैकी जिप्सी हा चित्रपट कांस मोहोत्सवासाठी जाणार असल्याची माहिती प्रोग्रॅम डायरेक्टर विशाल शिंदे यांनी दिली.

पालकांचा आणि मुलांचा जो प्रतिसाद आम्हाला मिळाला आहे त्यावरून पुढच्या वर्षी आम्हला दोन स्क्रीन घ्यावे लागतील आणि याचा आम्हाला खूप आनंद होत आहे अशी भावना संवाद पुणे चे अध्यक्ष सुनिल महाजन यांनी व्यक्त केली. सिटी प्राईड कोथरुडचे अरविंद चाफळकर व प्रकाश चाफळकर, 'कोहिनूर' ग्रुपचे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल, 'कावरे आईसक्रीमचे' राजूशेठ कावरे, 'स्टोरीटेलचे' प्रसाद मिराजदार, प्रोग्रॅम डायरेक्टर विशाल शिंदे, 'मेहेता प्रकाशनचे' अखिल मेहता आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी त्यांच्या सत्कार केला गेला. केतकी महाजन बोरकर यांनी प्रास्ताविक केले.

# कोकण रेल्वे सुरु करण्याचे आव्हान

## कोल्हापूरला नेहमीच सापत्न भावाची वागणूक

**कोल्हापूर :** राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी दूरदृष्टी ठेवून संस्थानाच्या खर्चाने मिरजेपर्यंत आलेलीरेल्वेकोल्हापूरपर्यंतआणली. रेल्वेच्यानकाशावर असूनही सुविधांबाबत कोल्हापूरला नेहमीच सापत्नभावाची वागणूक मिळालेली आहे. १३२ वर्षे झाल्यानंतरही कोल्हापूरच्या संथ रेल्वेला पुरेशी 'गती' मिळालेली नाही. कोकण रेल्वे, लांब पल्ल्याच्या रेल्वे, वंदे भारतसारखे नवीन रेल्वे प्रकल्प सुरू करण्याबाबत अजूनही कोल्हापूरला ठेंगा दाखवला जात आहे. यासाठी लोकप्रतिनिधींची 'शक्ती' मिळण्याची गरज आहे. गेल्या ५० वर्षांपासून कोल्हापूरच्या रेल्वे विकासासाठी लोकांकडून सातत्याने केल्या जाणाऱ्या मागण्या आता थोड्या प्रमाणात पूर्ण होत आहेत. कोल्हापूर ते मुंबई आणि पुढे अन्यत्र वेगाने जाण्यासाठी कोल्हापूर ते पुणे मार्गाचे दुहेरीकरण आणि विद्युतीकरण अत्यावश्यक होते. मात्र कोल्हापूर, मिरज ही स्थानके दक्षिण रेल्वे विभागामध्ये मोडत असल्याने कोल्हापूरचा कधी विचारच झाला नाही. त्यामुळे मुंबईहून कोल्हापूरला येण्यासाठी १० तासांचा मोठा कालावधी लागत होता.

आता दुहेरीकरण-विद्युतीकरणाचे काम ९० टक्के पूर्ण होत आहे. त्यामुळे नवीन रेल्वेगाड्यांचा मार्ग मोकळा होईल. मिरज-कुर्डूवाडी मार्गाचे रुंदीकरण पूर्ण झाल्यानंतर कोल्हापूरपासून सोलापूर आणि हैदराबादपर्यंत रेल्वे प्रवास शक्य झाला आहे. दिल्ली, धनबाद, अहमदाबादसाठी रोज रेल्वेची मागणी असूनही ती आठवड्यातून एकदा सोडली जाते. यामुळे व्यापार, उद्योगाला मर्यादा आहेत.कोकण रेल्वे कोल्हापूरला कधी जोडणार

कोकणाला कोल्हापूर जोडण्याच्या महत्त्वाकांक्षी कोल्हापूर ते वैभववाडी या नवीन रेल्वेमार्गासाठी रेल्वेमंत्री सुरेश प्रभू यांच्यामुळे पहिल्या टप्प्यात २५० कोटी रुपयांची तरतूद केली. पण ५० वर्षे होऊन गेली; परंतु ही मागणी अद्यापही सर्वेक्षणाच्याच पातळीवर आहे. यामुळे पश्चिम किनारपट्टी व पूर्व किनारपट्टी जोडल्या जाऊन उद्योग, व्यापाराला चालना मिळणार आहे. ही जमेची एक बाजू सोडल्यास अन्य सुविधांबाबत ठेंगाच दाखविला असेच म्हणावे लागेल.मॉडेल स्टेशनची घोषणा हवेतच




तत्कालीन रेल्वेमंत्री नितीशकुमार यांची कोल्हापूर मॉडेल स्टेशनची घोषणा हवेतच विरली. त्याचा पाठपुरावा कोणत्याच लोकप्रतिनिधींनी केला नाही. सध्याची इमारत अपुरी पडत असल्याने उशिरा का होईना अमृतभारत योजनेतून पुनर्विकासाचे काम सुरू आहे; पण त्याला गती नाही, असे लोकांचे म्हणणे आहे.१८९१ : मिरज ते कोल्हापूर पहिली रेल्वे सुरू४८ किलोमीटरचा पहिला ट्रॅक शाहू महाराजांच्या वैयक्तिक निधीतून१९७१ : मीटरगेजचे ब्रॉडगेजमध्ये परिवर्तन२०२० : कोल्हापर-मिरज एकेरी विद्युतीकरण मार्ग४ एकूण प्लॅटफॉर्म११ एक्स्प्रेस४ डेमू गाड्या२ सुपरफास्ट१७ : एकूण धावणाऱ्या रेल्वे

कोल्हापूर रेल्वेस्थानकातून लांब पल्ल्याच्या गाड्यांसाठी मिरज रेल्वेमार्गाचे दुहेरीकरण गतीने पूर्ण होण्याची गरज आहे. डेमू गाड्यांची संख्या वाढवणे, सांगली, पुणे शटल सर्व्हिस सुरू करणे, कोल्हापूर ते वैभववाडी, मुंबईसाठी नवीन गाडी सुरू करणे, फेऱ्या वाढवणे, वंदे भारत या गाड्या होणे अपेक्षित आहे. -शिवनाथ बियाणी, सदस्य, मुंबई विभागीय रेल्वे सल्लागार समिती

दुसरे रेल्वे टर्मिनल केल्यास नवीन लांब पल्ल्याच्या रेल्वे सुरू होतील, कोल्हापूर-मिरज दुसरी रेल्वे लाइन टाकणे, कोल्हापूर-वैभववाडी मार्गाचा पाठपुरावा करणे, कऱ्हाड-बेळगाव नवीन रेल्वे मार्ग कोल्हापूरला महामार्गाशी समांतर करणे गरजेचे आहे. लोकप्रतिनिधींकडे वारंवार मागण्या केल्या; पण हे प्रश्न सुटलेले नाहीत. ते मार्गी लागल्यास जिल्ह्याच्या पर्यटन, व्यापार उद्योगाला चालना मिळून रोजगाराच्या संधी येतील. -मधुसूदन पावसकर, अध्यक्ष, युनिटी करवीर विकास संघ मंच, कोल्हापूर.

# पावसामुळे आंब्याचे भाव उतरले, विक्रीवरही परिणाम

**नागपूर :** अवकाळी पावसामुळे आंब्याच्या विक्रीवर परिणाम झाला असून भावही उतरले आहेत. कळमना फळे बाजारात संपूर्ण मार्च महिन्यात १०० ते १३० रुपयांवर पोहोचलेले बैगनपल्लीचे भाव सध्या दर्जानुसार ३० ते ५५ रुपये किलोपर्यंत घसरले आहेत. पावसामुळे भाव आणि विक्रीत घसरण झाली आहे. मात्र, किरकोळ बाजारात दुप्पट आणि अडीचपट भाव आहेत.



बैगनपल्लीची ८० टक्के विक्रीसध्या कळमन्यातील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या फ्रूट बाजारात बैगनपल्ली, हापूस, तोतापल्ली, नाटी, दशेरी आंब्याची विक्री सुरू आहे. बैगनपल्ली आंध्रप्रदेश आणि तेलंगाना या राज्यातून येतो. ५ ते ७ टन क्षमतेच्या जवळपास १०० गाड्यांची आवक असून ठोकमध्ये ३० ते ५५ रुपये भाव आहेत. सर्व आंब्याच्या तुलनेत बैगनपल्लीची ८० टक्के विक्री होते. तोतापल्ली, नाटी व दशेरीलाही मागणी कळमन्यात तोतापल्ली आंब्याची आवक आंध्रप्रदेशातून होत आहे. २० किलो क्षमतेच्या ३०० हून अधिक क्रेट दररोज येत असून भाव २० ते २५ रुपये किलो आहेत.

शिवाय नाटी आंब्याची आंध्रप्रदेशातून ५ ते ७ टनाची एक गाडी दररोज येत आहे. १५ ते २० रुपये किलो भाव आहेत. रसासाठी दशेरी आंब्याचे चाहते आहेत. २ ते ३ टन क्षमतेच्या ५ ते १० गाड्यांची आवक असून भाव ३० ते ६० रुपये किलो आहे. लंगडा आंब्याची आवक सोमवारपासून विदर्भातील लंगडा आंब्याची आवक सोमवारपासून सुरू होईल. हा आंबा दरवर्षी कुही, मांढळ, भिवापूर, अड्याळी, भंडारा जिल्हा, गोंदिया जिल्ह्यातून येतो. एक ते दीड टन क्षमतेच्या टेम्पोने आंबे कळमन्यात विक्रीसाठी येतात .हापूस आंब्याचे ग्राहक वेगळेच कोकणातील हापूस आंबा महागच आहे. हा आंबा खरेदी करणारा वर्गही वेगळाच आहे. हे ग्राहक थेट कळमन्यात येऊन खरेदी करतात. रत्नागिरीचा हापूस आंब्याचे भाव दर्जानुसार ६०० ते एक हजार रुपये डझन आहेत. सध्या दररोज एक डझन क्षमतेच्या ३०० हून अधिक पेट्यांची आवक होत आहे.

आंब्याचे उत्पादन जास्त, भाव आटोक्यातकळमन्यातून बैगनपल्ली आंबे लगतचे राज्य आणि देशात विक्रीसाठी पाठविले जातात. सर्व आंब्यांमध्ये ८० टक्के बैगनपल्लीची विक्री होते. हे आंबे मार्चमध्ये विक्रीसाठी आले, तेव्हा १०० ते १३० रुपये किलो तर आता ३० ते ५५ रुपये भाव आहेत. काही ग्राहक हापूस आंबे खरेदीसाठी कळमन्यात येतात. भाव कमी होणार नाहीत. आंब्याची आवक १५ जूनपर्यंत सुरू राहील.

## २५ रेल्वे स्थानकांवर 'डिजिटल मॅप'

**नागपूर :** हे कुठे आहे, ते कुठे आहे, असे विचारत फिरण्याची किंवा 'ढूंढो ढूंढो रे साजना' म्हणण्याची वेळ रेल्वे प्रवाशांवर येणार नाही. होय,नागपूररेल्वे स्थानकासह विभागातील २५ स्थानकांवर प्रवाशांना आवश्यक सेवा-सुविधांची माहिती देण्यासाठी डिजिटल मॅप (नकाशा) ची व्यवस्था करण्यात आली आहे. त्यातील १७ स्थानकांवर सुविधा कार्यान्वित झाली आहे.

बाहेरगावाहून आलेल्या बहुतांश प्रवाशांना वेटिंग रूम, तिकीट काउंटर लिफ्ट, पोलिस स्टेशन आदींसह अनेक सेवांची माहिती नसते. त्यामुळे प्रवासी मदत (चौकशी) केंद्रावर रांगेत उभे होतात. तेथे एवढा गोंगाट अन् गर्दी असते की नंबर आल्यानंतर समोरचा व्यक्ती काय सांगतो आहे, ते नीट लक्षातच येत नाही. शिवाय, माहिती अधिकाऱ्यालाही एवढी गडबड असल्याचे जाणवते की, तो झटपट माहिती देऊन माहिती विचारणाऱ्याला बाजूला करण्याचा प्रयत्न करतो. मागच्या प्रवाशांचाही तगादा असतो. त्यामुळे अर्धवट माहिती घेऊन प्रवाशाला पाहिजे असलेली सुविधा शोधण्यासाठी इकडून तिकडे चकरा माराव्या लागतात. नंतर पुन्हा पुन्हा दुसऱ्यांकडे विचारणा करावी लागते. प्रचंड मनस्ताप देणाऱ्या या प्रकारातून आता रेल्वे प्रवाशांची सुटका होणार आहे.

कारण मध्य रेल्वेने नागपूर विभागातील २५ प्रमुख रेल्वे स्थानकांवर डिजिटल नकाशाची सुविधा उपलब्ध करून दिली आहे.



# शरद पवार गटाचा जाहीरनामा

## गरीब महिलांना वर्षाला एक लाख रुपये देणार

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाचा लोकसभा निवडणुकीसाठीचा जाहीरनामा बुधवारी जाहीर करण्यात आला. शरद पवारांच्या उपस्थितीत प्रकाशित करण्यात आलेल्या या जाहीरनाम्याला शपथनामा असं नाव देण्यात आलं आहे.

शरद पवार गटाच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या या जाहीरनाम्यात महागाई, महिला आरक्षण, जातनिहाय जनगणना, शिक्षण, पर्यटन आणि रोजगार अशा विषयांवर जोर देण्यात आला आहे.

महागाईच्या मुद्द्याचा विचार करता पेट्रोल आणि डिझेलच्या किमतींवर मर्यादा आणण्यात आश्वासन यात देण्यात आलं आहे. तसंच स्वयंकापाच्या गॅसचे दर ५०० रुपयांपर्यंत ठेवण्यासाठी केंद्र सरकारची सबसिडी देण्याचं आश्वासनही देण्यात आलं आहे.

रोजगाराच्या बाबतीत रिक्त असलेल्या केंद्र सरकारमधील जवळपास ३० लाख जागा भरण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचं या जाहीरनाम्यात म्हटलं आहे. तसंच डिग्री आणि डिप्लोमा धारक विद्यार्थ्यांना साडेआठ हजार शिष्यवृत्ती देण्याचं आश्वासनही दिलं आहे.

महिला आणि मुलींच्या शिक्षणातील अडथळे दूर करून शासकीय नोकरीत महिलांना ५० टक्के आरक्षणाचं आश्वासन देण्यात आलं आहे. तसंच शाळा कॉलेजांत महिला सुरक्षेच्या मुद्द्यावर लक्ष देणार असल्याचंही म्हटलं आहे. तसंच गरीब महिलांना वर्षाला १ लाख रुपये देण्याचं आश्वासनही दिलं आहे.

जातनिहाय जनगणनेच्या मुद्द्याचाही राष्ट्रवादी काँग्रेसच्या या शपथनाम्यामध्ये उल्लेख करण्यात आला आहे. त्याचबरोबर आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा दूर करण्यासाठी विशेष कायदा करण्याचं आश्वासनही देण्यात आलं आहे.

# रक्षा खडसे, स्मिता वाघ यांच्यासह २८ जणांनी भरले उमेदवारी अर्ज

**जळगाव :** रावेर आणि जळगाव लोकसभा मतदारसंघासाठी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी २८ जणांनी ३९ अर्ज दाखल केले. त्यातरावेरमधूनभाजपच्या उमेदवार रक्षा खडसे तर जळगावमधून स्मिता वाघ यांचा समावेश आहे. राष्ट्रवादी शरद पवार गटाचे जिल्हाध्यक्ष रवींद्र प्रल्हादराव पाटील, वंचित बहुजन आघाडीकडून संजय पंडीत ब्राम्हणे यांनीही उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.

शेवटच्या दिवसापर्यंत जळगाव लोकसभा मतदार संघात २५ उमेदवारांनी ३६ अर्ज दाखल केले आहेत. तर रावेर लोकसभा मतदार संघात ३१ उमेदवारांनी ४५ अर्ज दाखल केले आहेत. शेवटच्यादिवशी जळगाव मतदारसंघासाठी १७ उमेदवारांनी २१ अर्ज भरले तर रावेर साठी ११ उमेदवारांनी १८ अर्ज भरले.



# शिरटीचे ग्रामदैवत श्री भैरेश्वर मंदिर कलशारोहण व वास्तुशांती सोहळ्यानिमित्त धार्मिक कार्यक्रम उत्साहात

### धार्मिक विधी होमहवन समाज प्रबोधन व्याख्यान संपन्न

**शिरोळ :** शिरटी (ता शिरोळ) येथील जागृत ग्रामदैवत श्री भैरेश्वर मंदिराच्या कलशारोहण व वास्तुशांती सोहळ्याच्या दुसऱ्या दिवशी गुरुवारी विविध धार्मिक कार्यक्रम होमहवन वास्तुशांती महाप्रसादाचे वाटप समाज प्रबोधनपर व्याख्यान असे कार्यक्रम उत्साहात पार पडले मंदिरात दिवसभर भाविकांची दर्शनासाठी रीघ लागली होती या धार्मिक सोहळ्यामुळे गावात चैतन्यदायी व भक्तिमय वातावरणात निर्माण झाले आहे

येथील ग्रामदैवत श्री भैरेश्वर मंदिराचा जीर्णोद्धार सर्वांच्या सहकार्याने करण्यात आला आहे श्री भैरेश्वर देवालयाचे काम पूर्णत्वास आले आहे यामुळे या मंदिराचा कलशारोहण व वास्तुशांती सोहळ्यास बुधवारपासून उत्साहात प्रारंभ झाला आहे श्रीक्षेत्र आडी येथील श्री दत्त देवस्थान मठाचे प्रमुख परमाब्धिकार प पू परमात्मा महाराजांच्या दिव्य सानिध्यात मांगुरचे शाम भटजी यांच्या उपस्थितीत हा धार्मिक सोहळा होत आहे



श्री भैरेश्वर देवालयाच्या कलशारोहण व वास्तुशांती सोहळ्यानिमित्त दुसऱ्या दिवशी गुरुवारी पहाटे साडेपाच वाजता श्री भैरेश्वरास अभिषेक घालण्यात आला त्यानंतर कलश अभिषेक गणपती पूजन पुण्याहवचन मातृका पूजन मादी श्राद्ध ब्रह्म पीठ स्थापना रुद्र पीठ स्थापना मुख्य देवता स्थापना वास्तु पीठ स्थापना अग्नी स्थापना नवग्रह स्थापना वास्तुशांती होम हवन असे धार्मिक विधी कलश सवालधारक मानकरी पुजारी व ग्रामस्थांच्या उपस्थितीत मोठ्या भक्तीमय वातावरणात पार पडले या निमित्ताने दिवसभर मंदिरात दर्शनासाठी भाविकांची रीघ लागली होती कलशारोहण व वास्तुशांती सोहळ्यानिमित्त सकाळ संध्याकाळ महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे या महाप्रसादाचा हजारो भाविकांनी लाभ घेतला

कलशारोहण व वास्तुशांती सोहळ्याच्या निमित्ताने गावात शुभकार्य होत आहे यामुळे अनेक माहेरवाशीन लेकिंनी मंदिरासाठी गारवा आणला होता तो गारवा सोडून भाविकांना प्रसाद म्हणून वाटप करण्यात आला विविध भागातील शेकडो माहेरवाशीण लेकी या धार्मिक सोहळ्यासाठी आपल्या माहेरी आल्या आहेत तसेच या धार्मिक सोहळ्यासाठी प्रत्येक जण आपल्या परीने विविध स्वरूपात मदत करीत आहे

सायंकाळी युवा कीर्तनकार सोपानदादा कनेरकर (महाराज) यांचे संस्कार या विषयावर प्रबोधनपर व्याख्यान झाले त्यांनी सुजाण समाज घडवायचा असेल तर सुसंस्कारित पिढी घडवायला हवी यासाठी मार्गदर्शन केले यावेळी खानगोंडा पाटील जीवंधर चौगुले रामचंद्र पारदोळे बाळासो गवळी शशिकांत उदगांवे राजकुमार वारनोळे जावेद खतीब यांच्यासह ग्रामपंचायतीचे पदाधिकारी गावातील प्रमुख मानकरी विविध लोकप्रतिनिधी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते

उद्या शुक्रवारी कलशारोहण व वास्तुशांती सोहळ्याचा मुख्य दिवस यानिमित्ताने पहाटे साडेपाच वाजता श्री भैरेश्वरास अभिषेक घालण्यात येणार आहे यानंतर सकाळी दहा वाजता सर्व कलश पूजन व होमहावन होणार आहे दुपारी एक वाजून बेचाळीस मिनिटांपासून कलश स्थापना सोहळा होणार आहे सायंकाळी सहा वाजता चल हवा येऊ द्या फेम वृषभ आकीवाटे त्यांचा हास्यगंध हा कार्यक्रम होणार आहे यावेळी धनाजी भोसले मनोज चौगुले प्रमोद माळी श्रीपती कुंभार शामराव गंगधर श्रेणिक मगदूम राजगोंडा पाटील आप्पा भोसले यांच्यासह ग्रामपंचायतीचे सर्व पदाधिकारी गावातील प्रमुख मान्यवर व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत

हा धार्मिक सोहळा पार पाडण्यासाठी श्री भैरेश्वर जीर्णोद्धार व कलशारोहण समिती श्री भैरेश्वर युवक यात्रा कमिटी ग्रामपंचायत शिरटी गावातील सर्व तरुण मंडळे विविध सहकारी सेवा संस्था मंदिराचे पुजारी गुरव बंधू यांच्यासह ग्रामस्थ विशेष परिश्रम घेत आहेत या धार्मिक सोहळ्यानिमित्त भक्तिमय वातावरणाबरोबर गावात चैतन्य निर्माण झाले आहे.

# महायुतीच्यावतीने कोल्हापुरात बैठक : शनिवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची कोल्हापूरात जाहीर सभा

**कोल्हापूर :** लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे सामाजिक एकोप्याचे विचार, त्यांनी केलेली विकास कामे... आणि त्याचा आपल्याला लाभलेला वारसा याबाबत बोलण्यापेक्षा राजर्षींच्या गादीचा मान राखून आपण कोल्हापूरच्या विकासाच्या दृष्टीने काय पावले उचलली, याचा लेखाजोखा लोकसभा निवडणुकीत उमेदवार म्हणून उभे राहिल्यानंतर आता मांडण्याची वेळ आली आहे . तेव्हा सातत्याने प्रवक्त्या आडून वारसा न सांगता समोर या. जाहीरपणे कोल्हापूरचा विकास यावर थेट चर्चा करु,अशा शब्दात खासदार संजय मंडलिक यांनी काँग्रेसचे उमेदवार श्रीमंत शाहू महाराज छत्रपती यांना चर्चेचे जाहिर निमंत्रण दिले आहे.

शनिवार दि. २७ एप्रिल रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची कोल्हापूरात जाहीर सभा होणार आहे. त्या अनुषंगाने महायुतीच्या वतीने आज कोल्हापुरात बैठक घेण्यात आली. या बैठकीनंतर खास. मंडलिक यांनी पत्रकारांशी संवाद साधला.



खा. मंडलिक म्हणाले, राजर्षी शाहू महाराजांचा समतेचा विचार दिल्लीत पोचवायला आम्ही कटीबद्ध आणि समर्थ आहोत. राजर्षी शाहू महाराज ही आमची देखील अस्मिता आहे . ती आम्ही जपूच. पण अस्मिता जपताना आपल्या कर्तव्यात कुठे कसूर होणार नाही याचं भानही प्रतिस्पर्धी उमेदवारानं राखलं पाहिजे;पण नुसत्याच वारसा हक्कावर दावा केला जातो आहे. आपल्या ५० वर्षातील कामाचा लेखाजोखा काही मांडला जात नाही. गादीच्या अपमानाचा कांगावा केला जात आहे. पण प्रत्यक्ष जे उमेदवार आहेत त्यांनी गादीचा लौकिक वाढावा , राजर्षी शाहुंचा कृतीशील वारसा जपावा यासाठी काय केलं...? असा प्रश्नही त्यांनी यावेळी उपस्थित केला.

मंडलिक म्हणाले, राजर्षी शाहू महाराजांनी केलेला विकास आणि सुधारणा विसरता येत नाहीत. मात्र त्यांच्या कामाचे श्रेय न घेता आपण कोल्हापूरच्या विकासासाठी काय केले हे सांगावे. निवडणुकीच्या निमित्ताने ते विचारण्याची वेळ आली आहे. तेव्हा उमेदवार असलेल्या शाहू महाराजांनी समोरासमोर यावे. गेल्या ५० वर्षात काँग्रेसचे उमेदवार शाहु महाराज छत्रपती यांनी विविध क्षेत्रात काय केले आणि खासदार म्हणून आपण केलेले काम याबाबत खुली चर्चा करुया .

यावेळी पत्रकार परिषदेस पालकमंत्री हसन मुश्रीफ,खास. धनंजय महाडिक ,खास. धैर्यशील माने, राज्य नियोजन मंडळाचे अध्यक्ष राजेश क्षीरसागर, समरजीत घाटगे ,के. पी. पाटील आदी उपस्थित होते.

लोकशाहीत आपल्या उमेदवारांचा प्रचार करण्याची मुभा सर्वांनाच आहे; मात्र उमेदवाराने सातत्याने भूतकाळातल्या आपल्या पूर्वजांनी केलेल्या कामाचे श्रेय स्वतः घेऊन जनतेची दिशाभूल करू नये. याचे भान निवडणुकांचा प्रचंड अनुभव असणाऱ्या त्यांच्या प्रवक्त्यांनीही ठेवावे. प्रवक्त्यांनी बोलण्या पेक्षा स्वतः उमेदवाराने आपण आखलेल्या भविष्यातल्या विकास योजनांबाबत बोलावे.

एकंदरीतच प्रवक्त्यांचा या निवडणुकीतील उत्साह पाहता शाहू महाराज छत्रपती यांच्यावर उमेदवारी लादली गेली असल्याचे स्पष्ट होते. तब्बल २५ वर्षे याच मातीत असलेला पैलवान अशी स्वतः ची ओळख करून देणाऱ्यांना हे लक्षात येत नाही, की निवडणुकीला उभ्या असणाऱ्या उमेदवाराने प्रचारावेळी आपल्या विकासाच्या अजेंडा बाबत बोलणे किती महत्त्वाचे असते. आपण सांगू त्याच पद्धतीने प्रत्येकाने वागावे, अशा हुकूमशाही थाटात प्रवक्ते वावरत आहेत.

# 'प्रतापगड' गिळंकृत करण्याचे षड्यंत्र हाणून पाडले

पान १ वरून..

यावेळी आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले, जि.प.माजी उपाध्यक्ष वसंतराव मानकुमरे, जिल्हा बँक संचालक ज्ञानेश्वर रांजणे, सुनील काटकर, सौरभ शिंदे, जयदीप शिंदे, सयाजीराव शिंदे, शिवाजीराव मर्ढेकर, लक्ष्मणराव कडव, एकनाथ ओंबळे, पांडुरंग जवळ, गीताताई लोखंडे, कविता धनावडे, निर्मलाताई दुधाणे, कांतीबाई देशमुख, दत्ता पवार, रवी परामणे, अंकुश शिवणकर, तानाजीराव शिर्के, विनोद वेदे, अविनाश कारंजकर, अशोक भोसले, वीरेंद्र शिंदे, संदीप परामणे, समाधान पोकळे, भाजपा तालुकाध्यक्ष श्रीहरी गोळे, दादा पाटील, बाळासाहेब पाटील-सरपंच आनेवाडी, नाना पवार, विठ्ठल मोरे-संचालक प्रतापगड कारखाना, रामभाऊ शेलार, तुकाराम धनवडे, सागर धनावडे आदी मान्यवर उपस्थित होते.

उदयनराजे म्हणाले, जावळी तालुक्यातील शेतकऱ्यांचे हित लक्षात घेऊन या ठिकाणी प्रतापगड कारखान्याची निर्मिती करण्यात आली. कालांतराने हा कारखाना अडचणीत आला. माझ्या विरोधातील उमेदवार त्यावेळी विद्यमान आमदार होते. सत्ता त्यांच्या ताब्यात होती. त्यांनी कारखाना वाचवायचा सोडून तो गिळंकृत करण्याचा विचार सुरू केला होता. त्याचवेळी कारखान्याच्या तत्कालीन अध्यक्ष सुनेत्राताई शिंदे, विद्यमान अध्यक्ष सौरभबाबा शिंदे हे मला भेटायला आले होते. कारखान्याची वस्तुस्थिती त्यांनी मला सांगितली आणि हा कारखाना शेतकऱ्यांच्या ताब्यात राहिला पाहिजे अशी मागणी केली. त्यानंतर मी या दोघांना घेऊन दिल्लीला गेलो होतो. आम्ही प्रयत्न करून हा कारखाना शेतकऱ्यांच्या ताब्यात ठेवला म्हणून आज तो पुन्हा नव्या जोमाने सुरू आहे.

स्वर्गीय अण्णासाहेब पाटील यांनी माथाडी युनियन स्थापन केले. त्यांच्या निधनानंतर माथाडी युनियनचे नेतृत्व संबंधिताने ताब्यात घेतले. त्या ठिकाणीही गैरव्यवहार केला. मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या घोटाळ्याप्रकरणी ते सध्या जामिनावर बाहेर आहेत. काँग्रेसच्या सत्तेच्या काळात घोटाळे करणाऱ्यांची इतकी सवय लोकांना लागले होती, की लोकांची नजरच मेलेली होती. घोटाळे करणे हा लोकशाहीचाच भाग आहे, असंच लोकांना वाटू लागलं होते. मात्र मोदींच्या नेतृत्वाखालील भाजपचे सरकार केंद्रात सत्तेवर आल्यानंतर घोटाळेबाजांना चाप बसला. गेल्या दहा वर्षात महायुतीतील एकाही नेत्यावर घोटाळ्याचा आरोप झालेला नाही. भाजप सरकारने केलेली कामे जनतेसमोर आहेत. जावळीसह जिल्ह्याचा विकास आणखी गतीने करायचा आहे. युती सरकारच्या काळात जिल्ह्याचा विकास अत्यंत गतीने सुरू असताना पुढच्या निवडणुकीमध्ये जनतेने काँग्रेसच्या बाजूने कल दिला त्याचे परिणाम आपण पंधरा वर्षे भोगले आहेत. आता पुन्हा भावनेच्या भरात आपण मतदान केले तर तेच दिवस पुन्हा येतील. त्यामुळे आपण सगळ्यांनीच आता सावध व्हायला पाहिजे. महायुतीच्या सरकारला सत्तेवर बसवलं पाहिजे. असेही उदयनराजे म्हणाले.

■ **माझ्या विरोधातील उमेदवार चिमटा काढण्यात, डोळा मारण्यात पटाईत**

माझ्या विरोधात जे उमेदवार उभे आहेत, त्यांनी आमदारकीच्या काळात किती प्रकल्प जावळीत आणले ते त्यांनी जाहीर करावे. लोकांचा विकास करण्याऐवजी भूलथापा मारून त्यांनी लोकांचा विश्वासघात केला आहे. हा माणूस चिमटा काढण्यात डोळे मारण्यात पटाईत आहे, तरी जनतेने अशा माणसापासून सावध व्हावे असे आवाहन उदयनराजेंनी केले.

■ **काम करायला वेळ नाही पण काड्या लावायला भरपूर वेळ**

काही लोकांना काड्या लावायला भरपूर वेळ असतो. आपल्या परिसरात मोठ्या प्रमाणावर डोंगर आहे. अशा काड्या लावणाऱ्यांपासून सावध राहिलो नाही तर अधोगतीचा वनवा पेटून प्रगती खुंटेल अशी टीकाही उदयनराजेंनी केली.

■ **प्रदेशाध्यक्षांचे ज्ञान अपुरे..**

विरोधी पक्षाच्या प्रदेशाध्यक्षांची पारावरची सभा नुकतीच केळघर मध्ये पार पडली. शिवेंद्रसिंह राजेंनी केलेल्या विकास कामामुळे त्यांचे डोळेही दिपले असतील. माझ्यामुळे काही लोकांना वारस नोंदीला अडचण येतात असे संबंधित प्रदेशाध्यक्ष म्हटले होते परंतु त्यांचे ज्ञान अपुरे आहे मी कधी कुणाच्या आडवं गेलेलो नाही, कुणाच्या नोंदी नियमानासोर घालायचे असतील तर ते काम आपण बसून करून घेऊ असेही उदयनराजे म्हणाले.

■ **माझा शब्द खोटा ठरवू नका : शिवेंद्रसिंहराजे**

लोकसभेला महायुतीचे उमेदवार खासदार उदयनराजे भोसले यांच्या पाठीशी राहून त्यांना मोठ्या मताधिक्याने निवडून आणण्याचा शब्द मी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिलेला आहे हा शब्द जावळीतील जनतेने खोटा ठरवू नये असे आवाहन आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी यावेळी केले.

# पाटण प्रशासनाची तयारी पूर्णत्वाकडे

## सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी सुनील गाडे



**पाटण :** लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी पाटणमध्ये प्रशासनाची जय्यत तयारी सुरू आहे. पाटण विधानसभा मतदारसंघात सुमारे ४०९ मतदान केंद्रं असून २.९९ लक्ष नोंदणीकृत मतदार आहेत. पाटण विधानसभा मतदारसंघाची निवडणूक प्रक्रिया राबविण्यासाठी एकूण २ हजार २६० कर्मचाऱ्यांची आवश्यकता असून स्थानिक महिला वगळता उर्वरित कर्मचारी हे जिल्ह्यातील अन्य तालुक्यातून येणार आहेत.

जिल्ह्यात सर्वत्र प्रथम प्रशिक्षण एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात झाले असून दुसरे प्रशिक्षण पाटणमध्ये दि. २५ व दि. २७ एप्रिलला अडूळ येथील खाजगी मंगल कार्यालयात घेण्यात येणार आहे. ८५ वर्षांवरील वृध्द व अपंग यांच्यासाठी त्यांचे घरी जाऊन टपाली मतदान करून घेण्याची सुविधा करण्यात आली असून पाटणमध्ये सुमारे २२४ वृध्द व्यक्ती व ५३ अपंग । व्यक्तींचे मतदान त्यांचे घरी जाऊन दि. १ व २ मे रोजी करण्यात येणार आहे. लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी पाटण प्रशासनाची तयारी पूर्ण झाली असल्याची माहिती प्रांताधिकारी तथा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी सुनील गाडे यांनी दिली.

लोकसभा निवडणूक पार्श्वभूमीवर पाटण येथे आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी तहसीलदार अनंत गुरव यांची प्रमुख उपस्थिती होती.

सुनील गाडे म्हणाले, मतदान प्रक्रियेसाठी ईव्हीएम यंत्र तयार करण्याची प्रक्रिया दि. २८ ते दि. ३० एप्रिल दरम्यान डॉ. बाबासाहेब आंबेडकर मुलींचे वसतिगृह येथे पार पाडण्यात येणार आहे. रासाटी येथील मतदान केंद्रावर सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाबाबतची माहिती तसेच कोयनानगर येथील केंद्रावर कोयना धरणाबाबतचे फोटो व छायाचित्र लावण्यात येणार आहे. याशिवाय पाटणमधील एक व विहे गावातील एक मतदान केंद्र हे पूर्णपणे महिलांद्वारे संचालित करण्यात येणार असून दिव्यांग हे देखील कोंजवडे येथील केंद्रावर संपूर्ण मतदान प्रक्रिया पार पाडणार आहेत. मतदान प्रक्रियेआधी ५ दिवस तालुक्यातील मतदारांना मतदान माहिती स्लिपचे वाटप बीएलओमार्फत करण्यात येत आहे. तालुक्यात चार ठिकाणी स्थिर निरीक्षण पथक व ८ भरारी पथके कार्यान्वित आहेत. पाटण विधानसभा मतदारसंघात आतापर्यंत ६ सभांना परवानगी देण्यात आल्या असून ५ वाहनांचे परवाने निर्गमित करण्यात आले आहेत. तालुक्यात आचारसंहितेची काटेकोरपणे अंमलबजावणी सुरू असून किरकोळ स्वरूपाच्या २ तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. त्याबाबत उचित कार्यवाही करण्यात आली आहे.

स्वीपमार्फत मोठ्या प्रमाणात तालुक्याच्या दुर्गम भागात जनजागृती सुरू असून तालुक्याच्या ठिकाणी देखील सेल्फी पॉइंट, मानवी साखळी, पथनाट्य, स्वाक्षरी मोहीम, विविध पोस्टर्स व बॅनर्स मार्फत मतदारांना मतदानासाठी आवाहन करण्यात येत आहे.

पाटण तालुका हा दुर्गम व डोंगराळ भाग असल्याने या ठिकाणी मतदान प्रक्रिया पार पाडण्यासाठी काही आव्हाने असली तरी निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार तसेच जिल्हा निवडणूक अधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी ४५ सातारा लोकसभा मतदारसंघ जितेंद्र डुडी यांचे मार्गदर्शनाखाली सदर निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी पाटण तालुक्यातील प्रशासन सज्ज असल्याची माहिती सह निवडणूक निर्णय अधिकारी सुनील गाडे यांनी दिली.

■ **८ केंद्रांवर विशेष लक्ष**

पाटणमध्ये ८ मतदान केंद्रे ही अतिदुर्गम भागात असून त्याठिकाणी मतदान केंद्राजवळ मोबाइलद्वारे संपर्क होत नसल्याने त्या ठिकाणी विशेष लक्ष ठेवण्यात येणार आहे. अशा केंद्रांच्या जवळच्या परिसरात ज्या ठिकाणी रेंज येते त्या ठिकाणी एक कर्मचारी नियुक्त करण्यात येणार आहे. त्या ठिकाणी रनरची पण व्यवस्था करण्यात आली असून क्षेत्रिय अधिकारी तसेच पोलीस विभाग देखील या केंद्रावर विशेष लक्ष ठेऊन राहणार आहेत.

# खंडाळा येथे मतदान जनजागृतीसाठी स्वाक्षरी मोहीम

**खंडाळा :** स्वीप अभियानांतर्गत मतदान जनजागृतीप्रित्यर्थ खंडाळ्यात स्वाक्षरी मोहीम राबविण्यात आली.त्यास चांगला प्रतिसाद मिळाला.



लोकसभा सार्वत्रिक निवडणूकीची लगबग सुरू असून सातारा लोकसभा मतदारसंघामधील खंडाळा तालुक्यातील काही मतदार,अधिकारी, कर्मचारी दि. ७ रोजी मतदानाचा हक्क बजावणार आहे. या आशयानुसार स्वाक्षरी केली.

तालुका पंचायत समितीच्या किसनीवर स्मारक सभागृहात दि.७ रोजी मी मतदानाचा हक्क बजावणार असे म्हणत स्वाक्षरी करण्यात आली. गट विकास अधिकारी अनिल वाघमारे, सहा. गट विकास अधिकारी प्रकाश बोबले,गटशिक्षणाधिकारी तथा नोडल अधिकारी स्वीप सुजाता जाधव यांच्यासह विविध खात्याचे प्रमुख यांनी प्रतिनिधिक स्वरूपामध्ये स्वक्षऱ्या करित या मोहिमेस प्रारंभ करण्यात आला.

## विवेकानंद नगरातून युवत्ती बेपत्ता

**सातारा :** येथील विवेकानंदनगर येथील राहत्या घरातून सुहानी संतोष पार्टे (वय २०, मूळ रा. केळघर, ता. सातारा, सध्या रा. विवेकानंदनगर, सातारा) ही दि. २० रोजी सकाळी १० वाजण्याच्या सुमारास निघून गेली आहे. ती अद्याप परत आली नाही.

याबाबत वडिल संतोष पांडुरंग पार्टे (वय ४८, रा. केळघर) यांनी सातारा तालुका पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलीस नाईक वायंदडे तपास करत आहेत.

# साताऱ्यात मेघगर्जनेसह बरसल्या पावसाच्या सरी

**सातारा :** गेले तीन दिवस येणार म्हणत अपेक्षित असणारा हवामान खात्याच्या अंदाजानुसार वर्तवलेला अवकाळी पाऊस आज सायंकाळी ६ वाजण्याचे सुमारास जोरदार मेघगर्जनेसह सातारा शहर परिसरात बरसू लागला.

टपोऱ्या थेंबांनी आणि परिसरात काळोख दाटून आल्यानंतर सातारकरांची मात्र या पावसातून वाचवण्यासाठी मोठी पळता भुई थोडी झाली. एकीकडे लग्नाचा हंगाम जोराचा सुरू आहे त्यातच वाढत्या तापमानामुळे सातारकरांना चाळीस अंशाच्या आसपास उन्हाचा तडाखा सहन करावा लागत आहे गेले दोन दिवस पाऊस बसेल असा अपेक्षित अंदाज असतानाही जिल्ह्यात केवळ कराड फलटण जाऊदे आणि महाबळेश्वर तालुक्यात हा पाऊस बरसला आणि सातारकर मात्र या मोठ्या पावसाच्या प्रतीक्षेत होते. अखेर आज बुधवारी संध्याकाळी या पावसाने रस्ते ओले झाले आणि हवेत गारवा निर्माण झाला आहे.

या पावसामुळे हंगामातील झाडावरील कैऱ्या मात्र मोठ्या प्रमाणात गळून पडल्या तसेच उन्हाळी भुईमूग काढणीला या पावसामुळे व्यत्या निर्माण झाला. सायंकाळी बरसणाऱ्या या पाऊसधारामुळे घरी परतणाऱ्या चाकरमान यांना मात्र भिजतच घराची वाट शोधावी लागली.



**सातारा शहरात बरसणाऱ्या धारांनी रस्ते ओले झाले आणि रस्त्यावर निर्मनुष्य बनला होता .**
**(छाया : अतुल देशपांडे)**

## साताऱ्यातून गर्भवती महिला बेपत्ता

**राजदंड / सातारा**

गर्भवती असलेली २१ वर्षाची महिला बेपत्ता झाली असून याप्रकरणी शाहूपुरी पोलिस ठाण्यात घटनेची नोंद झाली आहे. ही घटना दि. २३ एप्रिल रोजी घडली असून महिला सातार्यात माहेरी आलेली होती. पोलिस पुढील तपास करत आहेत.

## जुगार प्रकरणी एकावर गुन्हा

**राजदंड / सातारा**

जुगार प्रकरणी निळकंठ शिवाजी सावंत (वय ४८, रा. नागेवाडी ता.सातारा) याच्या विरुध्द सातारा तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. पोलिसांनी त्याच्याकडून रोख ५६० रुपये व जुगाराचे साहित्य जप्त केले आहे.

# लोकसभा निवडणुकीच्या मतदानाची वेळ वाढवून मिळावी

## भाजपा शहराध्यक्ष विकास गोसावी यांचे जिल्हा प्रशासनाला निवेदन

**सातारा :** उन्हाळ्याची तीव्रता लक्षात घेऊन लोकसभा निवडणुकीच्या मतदानाची वेळ वाढवून मिळावी अशी मागणी भा ज पा शहराध्यक्ष विकास गोसावी यांनी उपजिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी श्री भगवान कांबळे यांच्या मार्फत जिल्हाधिकारी तथा मुख्य निवडणूक निर्णय अधिकारी, सातारा यांच्याकडे केली.



आत्ताची परिस्थिती पाहता, उन्हाचा तडाखा वाढला असून, उष्माघाताने अनेक नागरिकांना खूपच त्रास होत आहे, अनेक जणांना रुग्णालयात दाखल करावे लागत आहे, सातारा लोकसभेची मतदानाची तारीख सात मे आहे आणि मतदानाच्या तारखे पर्यंत उन्हाचा तडाखा आणखीन वाढण्याचा वाढून, दुपारच्या वेळी मतदार, मतदान करण्यासाठी बाहेर पडतील याची शक्यता नाही,आणि या मुळे मतदान कमी होण्याची शक्यता आहे या सर्व बाबींचा विचार करून जास्तीत जास्त मतदारांनी मतदानासाठी यावे या साठी, मतदानाची वेळ ही संध्याकाळी सात वाजे पर्यंत वाढवून द्यावी अशी मागणी करण्यात आली.

तसेच उष्माघातापासून वाचण्यासाठी सर्व मतदान केंद्रांवर, प्रथमोपचार पेटी, छत्र्या , पिण्याच्या पाण्याच्या थंड बाटल्या किंवा मोठे जार आणि ग्लास तसेच ओ आर एस ची पाकिटे यांची व्यवस्था करावी, प्रत्येक मतदान केंद्रावर प्रथमोपचारा साठी तज्ञ किंवा शिकावू डॉक्टर ची व्यवस्था करावी, मतदारांना उन्हात उभे राहावे लागू नये या साठी तात्पुरत्या तंबू ची, मंडपाची व्यवस्था करावी आणि मतदान केंद्राच्या गेट पासून मतदान केंद्राच्या खोली पर्यंत कारपेट टाकण्याची व्यवस्था करावी अशी मागणी सुद्धा भारतीय जनता पार्टी तर्फे करण्यात आली.

यावेळी सातारा शहराध्यक्ष विकास गोसावी, जिल्हा सरचिटणीस विठ्ठल बलशेटवार, युवा मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष विक्रम बोराटे, जिल्हा उपाध्यक्ष राहुल शिवनामे, सातारा शहर सरचिटणीस विक्रांत भोसले, प्रवीण शहाणे उपस्थित होते.

पान १ वरून

## 'मोदी गॅरंटी'चा चेक कधीच वटत नाही! - शरद पवार

मताधिक्क्याने लोकसभेत पाठवण्याचे आवाहन पवार यांनी केले.

दहा वर्षे ज्यांच्या हाती सत्ता आहे त्यांनी काय काम केले असा सवाल करून पवार म्हणाले, मोदी सरकारने केलेली कामे या निवडणुकीच्या प्रचारात मांडली पाहिजेत मात्र तसे होताना दिसत नाही. दहा वर्षांपूर्वी मनमोहनसिंग यांच्यावर टीका करून मोदी हे महागाईवर बोलत होते. सत्ता हाती दिल्यानंतर १५ दिवसांत ५० टक्के महागाई करणार असे मोदी सांगत होते. ७० रूपयांचे पेट्रोल १०६ रूपयांवर गेले हे पन्नास टक्के महागाई करण्याचे वचन का ? ४०० रूपयांचे सिलेंडर ११६० वर गेले असल्याचे पवार म्हणाले.

## मोहोळ यांच्या विजयाची औपचारिकता बाकी

चेतन तुपे, सुनील टिंगरे, रुपाली चाकणकर, माजी आमदार योगेश टिळेकर, भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष राजेश पांडे, सुनील देवधर, शिवसेनेचे सहसंपर्क प्रमुख अजय भोसले, मनसे नेते बाबू वागस्कर, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे शहर अध्यक्ष दीपक मानकर, शिवसेनेचे शहर अध्यक्ष नाना भानगिरे, पिंपरी-चिंचवडचे भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप, मनसेचे शहर अध्यक्ष साईनाथ बाबर, आरपीआयचे शहर अध्यक्ष संजय सोनावणे या वेळी उपस्थित होते.

सुमारे चार तास पदयात्रा सुरू होती. महर्षी धोंडो केशव कर्वे पुतळा, श्री मृत्युंजयेश्वर मंदिर, श्री दशभुजा गणपती मंदिर, नळस्टॉप मेट्रो स्टेशन, गरवारे महाविद्यालय, स्वातंत्र्यवीर स्मारक या मार्गे खंडोजीबाबा चौकात पदयात्रेचा जाहीर सभेने समारोप झाला. दरम्यान ठिकठिकाणी पदयात्रेचे जल्लोषात स्वागत झाले. फुलांचा वर्षाव आणि भव्य पुष्पहाराच्या माध्यमातून स्वागत केले गेले.

प्रचारसभा सुरू असताना महायुतीचे उमेदवार मुरलीधर मोहोळ हे उमेदवारी अर्ज भरण्यासाठी पुणे लोकसभा निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयाकडे रवाना झाले.

■ **आई-वडिलांचे आशिर्वाद घेऊन प्रारंभ**

अत्यंत उत्साही वातावरणात सकाळी कोथरूड येथील महर्षि कर्वे यांच्या पुतळ्यापासून मोहोळ यांच्या रॅलीला प्रारंभ झाला. तत्पूर्वी मोहोळ यांनी आई-वडिलांचे आशिर्वाद घेतले व ग्रामदेवता कसबा गणपतीला वंदन केले. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला वंदन केले. दिवंगत खासदार गिरीश बापट यांच्या कसब्यातील जनसंपर्क कार्यालयात असलेल्या प्रतिमेसही अभिवादन केले.

## वाई अर्बन बँकेवरील कर्जवाटपाबाबतचे निर्बंध रिझर्व्ह बँकेकडून शिथील

विस्कळीत झालेले व्यवहार कर्जव्यवहार सुरु झाल्याने पूर्वपदावर येणार आहेत, अशी माहिती बँकेचे अध्यक्ष अनिल देव, उपाध्यक्ष डॉ. शेखर कांबळे व बँकेच्या संचालक मंडळाने दिली आहे.

सोनेतारणदेखील बंद असल्याने बँकेच्या ग्राहकांची अडचण होत होती. ही अडचण दूर व्हावी, यासाठी बँकेचे संचालक मंडळ व अधिकारी वर्गाने बँकेची थकीत कर्जवसुली मोठ्या प्रमाणात सुरू केली होती. त्याचा चांगला परिणाम होऊन दि. ३१ मार्च, २०२४ रोजीची कर्ज वसुली समाधानकारक व रिझर्व्ह बँकेच्या नियमांना अधीन राहून अपेक्षित प्रमाणात NPA ची रक्कम कमी झाल्याने रिझर्व्ह बँकेने वाई अर्बन बँकेचे २५ लाखापर्यंतचे तारणी कर्ज व्यवहार पूर्ववत करण्याचे आदेश दिले आहेत, अशी माहितीही संचालक मंडळाच्यावतीने देण्यात आली आहे.

बँकेचे अध्यक्ष व संचालक मंडळ तसेच अधिकारी- कर्मचारी वर्गाने मोठ्या निर्धाराने हे आव्हान पेलले व थकीत कर्जवसुलीसाठी विविध प्रकारच्या उपाययोजना करून तसेच विविध कायदेशीर प्रक्रिया राबवून थकीत कर्जदारांकडील अपेक्षित थकबाकी रक्कम वसूल करण्यात यश मिळविले. त्यामुळे रिझर्व्ह बँकेने सर्व प्रकारचे तारणी कर्जव्यवहार पूर्वीप्रमाणे सुरू करण्यास अनुकुलता दर्शविली आहे. त्यानुसार बँकेला सोनेतारण, वाहन तारण, कार/दुचाकी खरेदी, घरबांधणी, मिळकती तारण याप्रकारातील पंचवीस लाखांपर्यंतची तारणी कर्जे व्यवहार सर्व शाखांमधून सुरु होत आहेत, असे अध्यक्ष अनिल देव यांनी नमूद केले. या पुढील काळात बँक कर्ज मंजूर करताना रिझर्व्ह बँकेच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करेल तसेच या पुढील कालावधीत बँकेपुढे असणारी सर्व आव्हाने पार करून बँक पुन्हा जोमाने कार्यरत होईल अशी ग्वाही अध्यक्ष अनिल देव यांनी दिली.

ठेवीदार व खातेदारांनी विश्वास ठेऊन केलेल्या सहकार्यामुळे बँकेस हि वाटचाल करता आली. आता नव्याने कर्ज वाटप सुरू झाल्याने बँकेच्या खातेदारांमध्ये समाधानाचे वातावरण पसरले आहे. तरी त्यांना यापुढे देखील बँकेकडून तत्पर व आधुनिक बँकिंग सेवा मिळेल. बँकेमध्ये ठेवलेल्या ठेवी या सुरक्षित असून बँकेची गुंतवणूक व तरलता अतिशय भक्कम आहे तरी यापुढील काळात देखील बँकेमध्ये खातेदारांनी ठेवी ठेऊन, भाग भांडवल घेऊन बँकेस असेच सहकार्य करावे असे आवाहन अध्यक्ष श्री. अनिल देव यांनी केले. मध्यंतरीच्या काळात काही निर्बंध असल्याने खातेदारांची गैरसोय होत होती. ती आता दूर झाल्याने खातेदारांनी आनंद व्यक्त केला व बँकेस शुभेच्छा दिल्या व संचालक मंडळाचे अभिनंदन केले.

यावेळी जेष्ठ सभासद व बँकेचे मार्गदर्शक अरुण देव, डॉ. सुधीर बोधे, नरहरी महाबळेश्वरकर, प्रा. किशोर अभ्यंकर तसेच संचालक माधव कान्हेरे, अॅड बाळकृष्ण पंडित, रमेश ओसवाल, महेश राजेमहाडिक, मकरंद मुळ्ये, काशिनाथ शेलार, प्रीतम भूतकर, स्वप्नील जाधव, अशोक लोखंडे, चंद्रकात गुजर व संचालिका सौ. ज्योती गांधी, सौ, सुनीती गोवित्रीकर, इजच् सदस्य अविनाश जोशी व रामचंद्र कानडे, मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीपाद कुलकर्णी, सरव्यवस्थापक चंद्रशेखर काळे इ उपस्थित होते.

## 'महाबळेश्वर अर्बन बँके'वर अजितदादा गटाचे वर्चस्व

जावेद वलगे, सी. डी. बावळेकर, सतीश ओंबळे, उषाताई ओंबळे, अनिल साळुंखे, नदीम शारवान, मनीषा पार्टे, प्रशांत कात्रट,संपत जाधव यांच्यासह बँकेचे मुख्य व्यवस्थापक फकीर वलगे हे देखील उपस्थित होते.

बँकेची स्थिती अत्यंत उत्तम आहे. संचालकांमध्ये कोणत्याही प्रकरचे गटतट नाहीत असे मावळते अध्यक्ष दत्ताजी वाडकर यांनी स्पष्ट करून नव्या पदाधिकारी यांना पूर्ण सहकार्य करू. एकदिलाने काम करून बँकेला पुन्हा गत वैभव प्राप्त करून देऊ अशी ग्वाही दिली. माजी अध्यक्ष राजेश कुंभारदरे यांनी अध्यक्ष म्हणून दत्ताजी वाडकर यांनी केलेल्या कामाचे कौतुक करून समीर सुतार यांच्या नेतृत्वाखाली देखील बँकेची चांगली प्रगती होईल असा विश्वास व्यक्त केला.

माजी नगराध्यक्ष डी. एम. बावळेकर, माजी उपनगराध्यक्ष अफाजल सुतार, माजी नगरसेवक रवींद्र कुंभारदरे, संदीप साळुंखे, रोहित ढेबे, तौफिक पटवेकर आदी मान्यवर बँकेत यावेळी उपस्थित होते.

## पाण्यासाठी खंडाळ्यात धरणे आंदोलन

वाढत आहे. त्यामुळे धोम बलकवडीतून पाणी सोडण्यात यावे अशी मागणी तालुक्यातील विविध गावच्या शेतकऱ्यांकडून जोर धरत आहे. खंडाळ्याचे तहसिलदार अजित पाटील यांना काही दिवसापूर्वी निवेदन दिले होते. त्यावर संबंधीत विभागाच्या अधिकाऱ्यांशी जिल्हाधिकारी यांच्या दालनात बैठक पार पडली.त्यामध्ये संबधित अधिकाऱ्यांना दोन दिवसांमध्ये खंडाळा तालुक्यासाठी आवर्तन सोडावे असे तोंडी आदेश दिले होते,असे सांगण्यात आले.

दरम्यान, खंडाळा तालुक्याला पाणी सोडण्यात यावे, या मागणीसाठी तहसिल कार्यालयावर शेतकऱ्यांनी धडक दिली. पाणी सोडा... पाणी सोडा, धोम बलकवडी धरणाचे पाणी सोडा, पाणी आमच्या हवकाचं, नाही कुणाच्या बापाचं अशी घोषणाबाजी करीत प्रशासकीय इमारतीच्या मुख्य दरवाजात शेतकऱ्यांनी ठिय्या मांडला.

यापूर्वीही पाणी टंचाई बाबत खंडाळा, बावडा, पळशी, केसुर्डी, हरळी, नायगाव, अहिरे, म्हावशी, धावडवाडी, घाडदरे, सुखेड, बोरी, खेड बु।।, पाडळी, निंबोळी, कोपर्डे या गावातील शेतकरी यांनी निवेदन देऊन व्यथा मांडल्या होत्या. वारंवार मागणी करूनही प्रशासन दूर्लक्ष करित असल्याची चर्चा आहे. तर धोम-बलकवडीच्या कालव्यातुन जोपर्यत पाणी सोडले जाणार नाही. तोपर्यंत ठिय्या आंदोलन सुरू ठेवणार असल्याचे यावेळी आंदोलनकर्त्यांकडून सांगण्यात आले.

## जावलीत रिपाइं आठवले गटाकडून भाजपाला सोडचिट्ठी

सातारा लोकसभा मतदारसंघात भाजपाने रिपाई ला सहकार्य केले नाही तसेच रिपाईचे एकमेव उमेदवार अशोकराव गायकवाड यांना निवडणुकीत भाजपाने मतदान केले नाही, फक्त इतर मतदारसंघात रिपारईची दलित मते घेण्याचा व स्वत-ची मते रिपाईला न देण्याचा अप्रत्यक्ष फॉर्मुला भाजपाने वापरल्याने संपूर्ण देशात मोदिंची लाट असूनही सातारची ऐकमेव जागा रिपाईला गमवावी लागली होती.ह्यावेळेसही रिपाईला एकही जागा दिली नाही.

आम्ही फक्त भाजपाला मतदान करण्यासाठी व त्यांनाच निवडून देण्यासाठी महायुती करायची का? कुठल्याही साध्या मीटिंगला रिपाईला सन्मानपूर्वक निर्मत्रण दिले जात नाही. महायुतीत राहुन रिपाईला योग्य सन्मान व न्याय मिळणार नसेल,सत्तेत वाटा मिळणार नसेल तर मतदानापुरते घटकपक्षाला गृहीत धरणार असाल तर असली युती काय कामाची असा प्रश्न बैठकीत सर्वानी उपस्थित केला.

जाती धर्माच्या नावाने देशात निर्माण झालेले अराजकता,धुळीला, मिळालेला शेतकरी, वंचित शोषित पीडित गरीब लोकाँची झालेली वाताहात, पक्ष फोडाफोडीच्या राजकाराणामुळे सामान्य माणसांच्या मनात सरकार विषयी निर्माण झालेली चीड व असंतोष, प्रचंड महागाई, मागासवर्गीय विध्यार्थीची बंद झालेली शिष्पवृत्त, रसातळाला गेलेली देशाची अर्थव्यवस्था या सर्व गोष्टींना जबाबदार असलेले सरकार या सर्व गोष्टींचा विचार करून जावली तालुक्यातील तमाम रिपाईच्या भीमसैनिकांनी व पदाधिकार्यानी इथून पुढे भाजपाला कुठल्याही निवडणुकीत सहकार्य किंवा मतदान करायचे नाही. असा निर्णय सर्वनुमते मेढा येथील रिपाईच्या मीटिंगमध्ये घेण्यात आला.

जावली तालुक्यातील गावागावात जाऊन भाजपाच्या विरोधात मोर्चे बांधणी करणारा असून जावलीतील दलित आंबेडकरी संघटना आपले स्वतंत्र अस्तित्व दाखवेल अशी ग्वाही रिपाईची जावली तालुकाध्यक्ष एकनाथ रोकडे यांनी दिली.

जावली तालुक्यात अंबेडकरी संघटनेकडे स्वतः निवडून येण्या एवढे मतदान नसले तरी कुणाला निवडून आणायचे व कुणाला पाडायचे एवढे निर्णायक मतदान मात्र नक्कीच आंबेडकरी संघटनेकडे असून त्याची ताकत या लोकसभा, विधानसभा, पंचायत समिती, जिल्हा परिषद निवडणुकीत नक्कीच बघायला मिळेल.

यावेळी जावली तालुक्यातील तमाम आंबेडकरवादी कार्यकर्ते पदाधिकारी बैठकीला उपस्थित होते.

